बुधवार, 28 सप्टेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 56
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 28 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-56 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-12 ● PRICE-5

# डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे विवाहितेचा बळी

## नातेवाईकांचा पोलीस स्टेशनसमोर ठिय्या : तब्बल ६ डॉक्टरांवर गुन्हा दाखल



आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद : चांदवड तालुक्यातील मंगरूळ येथील प्रियंका विकी निरभवने (वय २४) हिचा डॉक्टरांनी शस्त्रक्रिया दरम्यान निष्काळजीपणा केल्यामुळे जखम वाढत जाऊन दोन महिन्यांनी मृत्यू झाला. याप्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सकांच्या अहवालाचा आधार घेऊन चांदवड व पिंपळगाव बसवंत येथील निष्काळजीपणा करणाऱ्या डॉक्टरांवर गुन्हा दाखल झाला आहे. नाशिक जिल्ह्यात दोन मोठ्या हॉस्पिटलवर अशाप्रकारची कार्यवाही झाल्याने परिसरात हा चर्चेचा विषय झाला आहे.**

याबाबत सविस्तर वृत्त असे की, प्रियंकाला आठव्या महिन्यातच प्रसूती कळा सुरू झाल्याने चांदवड येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. येथे तिचे सीझर करण्यात आले. तिने गोंडस बाळाला जन्म दिला. तिला डॉक्टरांनी डिस्चार्जही दिला. मात्र काही दिवसात तिला प्रचंड वेदना सुरू झाल्या. त्यामुळे तिला पुन्हा उपचारार्थ दाखल केले असता पुन्हा शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र फारसा फरक न पडल्याने संदर्भीय सेवेसाठी पिंपळगाव बसवंत येथील प्रतिष्ठित दवाखान्यात दाखल करण्यात आले. तेथेही परत शस्त्रक्रिया करण्यात आली. तब्बल २०/२१ दिवसांच्या उपचारानंतर तिला मुंबई येथील के.ई.एम हॉस्पिटलला उपचारार्थ दाखल करण्यात आले. मात्र तिचा दि.२४ रोजी दुर्दैवी मृत्यू झाला. नातेवाईकांनी तिच्या दोन महिन्यांच्या बाळासह चांदवड पोलीस स्टेशन गाठत प्रचंड आक्रोश केला. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केल्याने तसेच प्रियंकाचा मृतदेह देखील पोलीस ठाण्यात ठेवण्यात आल्याने दिवसभर तणावाचे वातावरण होते. उपविभागीय पोलीस अधिकारी समिरसिंह साळवे, पोलीस निरीक्षक समीर बारावकर यांनी नातेवाईकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला.

अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत खांडवी यांनी देखील चांदवडला भेट देत परिस्थितीचा आढावा घेत नातेवाईकांची समजूत काढत रात्री उशिरा पोलिसांनी मृतदेह कडक बंदोबस्तात मंगरूळ या गावी पाठवला.


मात्र जिल्हा शल्यचिकित्सकांचा अहवाल आल्याशिवाय गुन्हे दाखल करता येत नसल्याचे पोलिसांनी सांगून देखील नातेवाईक ता.२६ रोजी दिवसभरात पोलीस स्थानक आवारात ठाण मांडून होते. शेवटी जिल्हा शल्य चिकित्सकांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. प्रियंकावर उपचार केलेली सर्व कागदपत्रे व तक्रारी अर्ज तपासल्यानंतर जिल्हा शल्यचिकित्सकांच्या तज्ञ समितीने या प्रकरणात सिजेरीयन शस्त्रक्रियेनंतर झालेल्या गुंतागुंतीचे वेळी योग्य निदान व वेळेत उपचार करण्यात विलंब झालेला आहे व प्रथमदर्शनी यात निष्काळजीपणा झाला असल्याचा अभिप्राय दिला. त्यांच्या अहवालाचा आधार घेऊन चांदवड पोलिसांनी चांदवड येथील खासगी रुग्णालय व पिंपळगाव येथील खासगी रुग्णालयातील तब्बल ६ डॉक्टरांवर भारतीय दंड संहिता १८६० नुसार कलम ३०४, ३०४ अ, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. नाशिक जिल्ह्यातील दोन मोठ्या दवाखान्यावर प्रथमच अशा प्रकारची कार्यवाही झाली आहे.



# उद्धव ठाकरेंना धक्का : सुप्रीम कोर्टाचा निवडणूक आयोगाच्या कार्यवाहीवर स्थगिती देण्यास नकार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रातील सत्तासंघर्षादरम्यान सर्वोच्च



न्यायालयाने शिंदे गटाला मोठा दिलासा दिला असून, ठाकरेंना धक्का दिला आहे. आज दिवसभर पार पडलेल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या कामकाजावर स्थगिती आणण्यास नकार दिला. यामुळे पक्षचिन्हासंबंधी निर्णय घेण्याचा निवडणूक



आयोगाचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे आत्तापर्यंत 'धनुष्यबाण' मिळवण्यासाठी शिंदे गट आणि ठाकरेंमध्ये सर्वोच्च न्यायालयात सुरु असलेली लढाई निवडणूक आयोगासमोर पोहोचली आहे. आपणच खरी शिवसेना असल्याचा शिंदे गटाचा दावा असून, निवडणूक आयोगाला यासंबंधी निर्णय घेण्यापासून रोखले जावे अशी मागणी ठाकरेंच्या वतीने करण्यात आली होती.

सर्वोच्च न्यायालयाने शिवसेनेची ही याचिका फेटाळून लावली.

न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती एम. आर. शहा, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी, न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह यांच्या पाच सदस्यीय घटनापीठापुढे सुनावणी पार पडली. आजपासून घटनापीठासमोर सुनावणीचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आल्याने हा दिवस ऐतिहासिक ठरला.

# पुण्यातील 'तो' पूल पाडणार

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुणेकरांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. चांदणी चौकातील पूल २ ऑक्टोबरच्या मध्यरात्री दोन वाजता पाडण्यात येणार आहे. त्यासाठी १ ऑक्टोबरला रात्री एक वाजता पासून २ ऑक्टोबरला सकाळी आठ वाजेपर्यंत वाहतूक बंद राहणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी दिली आहे. चांदणी चौकातील पूल पाडण्यासाठी १३०० छिद्रे घेण्यात आली असून ६०० किलो स्फोटके वापरण्यात येणार आहे. अवघ्या सहा सेंकदात हा पूल पाडण्यासाठी कालावधी लागणार आहे. पूल पाडण्याच्या कालावधीत २०० मीटर परिसर निर्मनुष्य केला जाणार आहे. तीन हॉटेल तेथे असून त्यांनाही खाली करण्याच्या नोटिसा दिल्या जाणार आहेत, असेही जिल्हाधिकारी देशमुख यांनी सांगितले. तसेच, यादरम्यान मुंबईवरुन सातारा येथे जाण्यासाठी किंवा साताऱ्यावरुन मुंबईला जाण्याचे प्रवाशांनी टाळावे, असे आवाहनही करण्यात आले आहे. यावेळी बुलडोझर, पोकलेन तसेच १०० ते १५० कर्मचारी तैनात केले जातील. मुंबईवरून पुण्यात पर्यायी मार्गाने येणारी तसेच साताऱ्यावरून मुंबईकडे जाण्यासाठी पर्यायी मार्गाने जाणाऱ्या वाहनाचे नियोजन करण्यासाठी पुणे, पिंपरी चिंचवड आणि पुणे ग्रामीण पोलीस दलाचे कर्मचारी तैनात केले जाणार आहेत, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# गेमिंग कंपनीला २१ हजार कोटींची जीएसटी नोटीस

## आतापर्यंत जीएसटी संकलनासाठी देशात पाठवण्यात आलेली सर्वाधिक रकमेची नोटीस


आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरु :** बंगळुरुमधील एका गेमिंग कंपनीला तब्बल २१ हजार कोटी रुपयांची वस्तू व सेवा कर (जीएसटी) नोटीस पाठवण्यात आली आहे. 'गेम्सक्राफ्ट टेक्नोलॉजी' असे या कंपनीचे नावे आहे. २०१७ ते ३० जून २०२२ दरम्यान या कंपनीने जीएसटीच्या माध्यमातून करचोरी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. 'गेम्सक्राफ्ट'ला आता जीएसटी महासंचालनालयाने कारणे दाखवा नोटीस पाठवली आहे. आतापर्यंत जीएसटी संकलनासाठी देशात पाठवण्यात आलेली ही सर्वाधिक रकमेची नोटीस आहे. ऑनलाइन गेम्सच्या काही चाहत्यांनी एकत्र येत २०१७ मध्ये ही कंपनी सुरु केली. मोबाईलवर खेळता येणारे रमी, गेमझी, रमी टाइम यासारख्या आर्थिक व्यवहारांवर आधारित आणि बेटीसंदर्भातील गेम्सची सेवा या कंपनीच्या माध्यमातून पुरवण्यात आली. आता जीएसटी महासंचालनालयाने या कंपनीने ऑनलाइन बेटिंगला प्रोत्साहन दिल्याचा ठपका ठेवला आहे. आपल्या ऑनलाइन जाहिराती आणि ऑफर्सच्या माध्यमातून या कंपनीने बेटींगला प्रोत्साहन




दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. महासंचालनालयाने या कंपनीच्या माध्यमातून एकूण ७७ हजार कोटींची बेटींग झाल्याचा दावा करण्यात आला आहे. २०१७ ते ३० जून २०२२ पर्यंतच्या कालावधीमध्ये करण्यात आलेल्या या बेटींगवर २८ टक्क्यांच्या हिशोबाने २१ हजार कोटींचा जीएसटी लागू होतो. ऑनलाइन माध्यमातून खेळवल्या जाणाऱ्या गेम्सवर खरोखर पैसे लावण्यासाठी ही कंपनी प्लॅटफॉर्म उपलब्ध करुन देते असं जीएसटी महासंचालनालयाचं म्हणणं आहे. या कंपनीच्या चौकशीदरम्यान फॉरेन्सिक पुराव्यांच्या आधारे ग्राहकांना कंपनीकडून बिलं देण्यात आलेली आहे. तसेच खोटी कागदपत्रं सादर करण्यात आल्याचंही स्पष्ट झालं आहे. एकदा या 'गेम्सक्राफ्ट वॉलेट'मध्ये पैसे टाकले की युझर्सला ते परत मिळण्याचा कोणताच मार्ग नसतो असंही महासंचालनालयाने म्हटलं आहे.

**या प्रकरणासंदर्भात 'गेम्सक्राफ्ट'च्या प्रवक्त्यांनी, कौशल्या दाखवणाऱ्या खेळांना कायदेशीर संरक्षण आहे. सर्वोच्च न्यायालयाने आणि उच्च न्यायालयांनी यासंदर्भातील निकाल वेळोवेळी दिले आहेत. रमी हा सुद्धा घोडेस्वारीप्रमाणे कौशल्य दाखवण्याचा खेळ आहे. त्यामुळे ही नोटीस अयोग्य आहे. आम्ही कायद्यानुसार जीएसटी आणि आयकर दिला आहे. आम्ही या नोटीसला योग्य पद्धतीने उत्तर देऊ अशी आम्हाला खात्री आहे. आम्हाला पाठवलेल्या नोटीसमध्ये २८ टक्के जीएसटीचा उल्लेख आहे जो नशीब आजमावणाऱ्या खेळांसाठी आणि लॉटरीसाठी आकारला जातो. मात्र ऑनलाइन कौशल्य दाखवणाऱ्या गेम्ससाठी १८ टक्के जीएसटी आकारला जातो, असं म्हटलं आहे.**



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# महिलांचा आंदोलनातील सहभाग - अशिक्षित किंकरी देवीचे योगदान

आधुनिक केसरी

**एक लढा असाही (भाग-5)**



विकासाच्या चक्रात ( विकास म्हणायचा का हा प्रश्नच आहे ) पर्यावरणाचे अतोनात नुकसान माणसाने केले. वृक्षराजी असलेले हिरवेगार जंगल नष्ट होऊन काँक्रीटची जंगले उभे राहू लागली. नदीकाठी, समुद्रकाठी कारखाने उभे राहू लागले. आपला घातक विषारी धूर वातावरणात सोडून वातावरण दूषित करू लागले. आपले केमिकलयुक्त सांडपाणी सरळ नद्यांमध्ये किंवा समुद्रात सोडून देऊ लागले. या सगळ्या गोष्टींनी पर्यावरणावर जीवघेणे प्रहार केले. पण तुम्हाला आम्हाला याची सवय झाली. विकास प्रक्रियेत हे चालायचेच असे समजून आम्ही त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करू लागलो. पण हिमाचलमधील किंकरी देवी हे सहन करू शकली नाही. तिने या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. साधारणपणे आपण असे समजतो की सुशिक्षित लोक अन्यायाविरुद्ध चांगले लढू शकतात. अशिक्षितांना काय कळणार कसे लढायचे ते ? हा समज किंकरी देवीने खोटा ठरवला. मी तर शिकलेली नाही, मी कसे लढू हा प्रश्न तिला पडला नाही. माझे काय होईल, लोक साथ देतील का असे प्रश्न तिला पडले नाहीत. कदाचित असा एखादा दुसरा विचार आलाही असेल तिच्या मनात, पण ती आपली लढाई लढण्यासाठी ठामपणे उभी राहिली. जी व्यक्ती आपली लढाई एकाकी का असेना पण प्रामाणिकपणे आणि उदात्त ध्येयाने लढत असेल अशा व्यक्तीला मदत मिळतेच. ' गॉड हेल्प्स देम हू हेल्प देमसेसेल्व्हज ' अशी एक इंग्रजी म्हण आहे. तिचा अर्थ हाच आहे. किंकरी देवीचा जन्म हिमाचल प्रदेशातील सिरमौर जिल्ह्यातील एका अतिदुर्गम अशा खेड्यात झाला. लहानपणापासून गरिबी पाचवीलाच पुजली होती. तिचे वडील एक सामान्य असे दलित शेतकरी. **(क्रमशः)**




## आनंदी पहाट

# गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगातील संधी

आधुनिक केसरी

करिअरची निवड करण्यापूर्वी आपल्या गरजांची योग्यता, त्यांची आपण करत असलेली अपेक्षा आणि त्यांची पूर्तता या सर्वच बाबींचा आपण अभ्यासपूर्वक विचार करणे महत्वाचे असते. अनेकदा आभासी दुनियेत मशगुल झालेल्यांना स्वतःचे चांगले-वाईट कळत नाही. अलीकडच्या काही काळापासून अनेकांना आभासी दुनियेचे प्रचंड आकर्षण वाटू लागले आहे. समाज माध्यमांच्याइतका विश्वास इतरांवर तर लांबच परंतू स्वतःवर देखील ठेवला जात नाही. अनेकदा सोशल मिडीयाच्या माध्यमातून झालेला त्रास, मनस्ताप, दुःख, नुकसान, फसवणूक आणि कालांतराने पश्चाताप भोगण्याची वेळ अनेकांवर येत असल्याचे आपण सर्वच ऐकत आहोत. सोशल मिडीयाच्या आहारी जाण्यामुळे आणि फसगत झाल्यामुळे सोशल मिडिया आपल्याला सोसत नाही, हे अभ्यासपूर्वक समजून घेण्याची गरज असते. गुगल काहीवेळा गुगली टाकत असते, हे लक्षातच घेतले जात नाही. आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपले करिअर अर्थात "अर्थार्जनासाठी निवडलेला आपल्या आवडीचा मार्ग" असतो. करिअरची निवड करण्यासंबंधीचा सखोल अभ्यास केला नाही आणि केवळ आभासाला भुलून निर्णय घेतला तर, त्याचे परिणाम आयुष्यभर भोगावे लागतात.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## || महालक्ष्मी ||

सावळाच वाली | वैष्णवांचा ||
साजिरा गोजिरा | विठ्ठल सावळा ||
आत्म्याचा जिव्हाळा | विटेवरी ||१||

संसाराची माया | मोहात सापडे ||
दुःखाचेच कडे | भोवताली ||२||

स्वार्थाचे लिंपन | वृत्तीस फासले ||
तीने नासवीले | उभ्या जन्मा ||३||

भजनी कीर्तनी | रमले ना मन ||
आता आले भान | कृपा झाली ||४||

पंचमहाभूते | दिंडीत नाचली ||
सावळाच वाली | वैष्णवांचा ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी

**जगदम्ब नमस्तुभ्यं प्रभातसमये नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यमपराह्ने नमो नमः।। २४ ।।**
जगदंबिके, तुला प्रभात समयी नमस्कार असो. जगदंबिके, तुला दुपारचे समयी नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं सन्ध्यायां ते नमो नमः।**
**निशायां च नमो मातः नमस्तेऽस्तु सदा सदा।। २५।।**
जगदंबिके, तुला संध्याकाळी त्रिवार नमस्कार असो. रात्रीचे समयी नमस्कार असो. तुला सदा सदा नमस्कार असो.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## नवरात्राची तिसरी माळ



आधुनिक केसरी

आपण आतापर्यंत पहात आलो आहोत की देवीचं मंदीर गावाबाहेर माळरानावर असते. कारण देवीचं सगळ्या गावावर लक्ष असतं आपली आई जशी काळजी घेते तशीच देवी पण संपूर्ण गावाची काळजी घेत असते म्हणून तर तिचे मंदिर नेहमी माळरानत असते. आता लोकसंख्या वाढली आहे. माळराने कमी झाली व देवीचं मंदिर गावात आले आहे. तिसऱ्या दिवशी माता मळवट पातळ चोळी कंठाहारा सारखे भरपूर सोळा प्रकारचे दागिने लेवून आली आहे तिच्या चेहर्यावर अत्यंत तेज आहे. तिच्या मनात भक्तांच्या प्रति अत्यंत प्रेम आहे ती साक्षात वात्सल्य मुर्ती आहे. संपूर्ण जगाला आधार देण्याचं सामर्थ्य तिच्यात आहे.अशी ही माता जगदानंददायिनी आहे. तिला आपण नमस्कार करूया. व्यक्ती, समाज,राष्ट्र सामर्थ्यवान होण्यासाठी समाजात जनजागृती होण्यासाठी देवीच्या विविध रूपांचे महत्व समजणे गरजेचे आहे. यासाठी देवीच्या विविध रूपांचे अनन्यसाधारण महत्व आहे. जया,विजया, अपराजिता,वात्सल्याने परिपूर्ण अशी ही वेदविश्वविभाविन्येयाने आपलं रक्षण करण्यासाठी सदैव्य तयार आहे. आपण तिला कोटींच्या कोटी वंदन करूया

सरस्वती, महालक्ष्मी, महाकाली या रूपात अवतार धारण करून वाईटांचा नाश व सज्जनांच्या रक्षणासाठी ती सदैव तयार आहे. आपल्या रोजच्या जीवनात हा संबंध कसा आहे ते मी आता तुम्हाला सांगते.

**1)सरस्वती :** आईचं बोट धरून आपण शाळेत पहिलं पाऊल टाकतो . ईथे आपल्या शिक्षणाचा श्रीगणेशा होतो म्हणजेच हा संदेश मिळतो की शिका मोठे व्हा सदाचार संपन्न व्हा.

**2) महालक्ष्मी :** महालक्ष्मी म्हणजे आता तुम्ही स्वःतच्या पायावर ऊभे रहा. सचोटीने सन्मार्गाने पैसे कमवा.आई मातेचा आशिर्वाद सतत तुमच्या घरात असणार आहे. व्यवहारी जागात वावरत असताना कोणत्याही दुष्ट भावना मनात आणु नका. सतत सन्मार्गावर रहा.

**3) महाकाली :** आपण महाकाली रूपात जेव्हा मातेचे दर्शन घेतो तेव्हा तिने दैत्याला आपल्या पायाखाली ठेवलेले दिसते याचा अर्थ मातेच्या वरील दोन्ही रूपाचा आणि महाकाली रूपात फरक आहे आपण जर वाईट वागलो वाईटकर्म केले तर माता आपल्याला पायाखाली घेते हे यातुन समजते. म्हणून कधीही वाईट वागु नका,सन्मार्गाची कास कधीही सोडू नका.नवरात्रात घटाच्या रूपात आलेल्या मातेचं भजन पुजन करून सेवा करा हा यामागे संदेश आहे.

पांडित्यं शोभते नैव न शोभंति गुणा नरे। शीलत्व नैव शोभंते महालक्ष्मी त्वया विना।तिसऱ्या माळेसाठी मातेला त्रिवार वंदन.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# तुळजापूरची आई भवानी

## तिसरी माळ

आधुनिक केसरी

घरा - घरात ..घट-स्थापंना झाली आहे , आई जगदंबा "घरी आलेली पाहुणी " तिच्या सेवेसाठी तिची सारी लेकरे मनोभावे तत्पर झाली आहेत " पूजा -आरती "प्रसाद , धूप लावल्यावर घरभर दरवळणारा सुगंध , फुलांची आरास, असे सुंदर आणि पवित्र वाटणारे वातवरण " नजर जाईल तिकडे दिसून येते आणि मन प्रसन्न होऊन जाते.

आपापल्या गावातील देवीच्या मंदिरातला उत्सव , पाहून मनात विचार येतो ..की

इथे जर इतके छान वातावरण आहे तर ..प्रत्यक्ष ..माहूर , तुळजापूर , कोल्हापूर "या ठिकाणी तर किती धमाल येत असणार ", होय मित्रांनो , आपण सर्वांनी कधी ना कधी या ठिकाणी जाऊन ..हे उत्सवी - भक्तिमय झालेले वातावरण अनुभवले असेलच.

माझ्या आठवणीप्रमाणे. माझी पहिली तुळजापूर -दर्शन वारी १९७३ - साली झाली.बँकेच्या ट्रेनिंग निमित्ताने गुलबर्गाला गेलो असताना येताना तुळजापूरला थांबून दर्शन घेऊन पुढे जायचे असे आम्ही पाच-सहा मित्रांनी एकमताने ठरवले आणि गुलबर्गाहून निघून रात्री तुळजापूर आलो खरे सुदैवाने मंदिर बंद होण्याच्या वेळेच्या आत पोंचलो" म्हणून दर्शन घडले.

आई तुळजाभवानीच्या मूर्ती समोर दर्शनासाठी उभे राहिलो, तेव्हा पंचीविशीच्या वयोगटात असणाऱ्या आम्हा तरुण मुलांना. आम्ही दर्शन घेतले आणि खूप काही वेगळे आणि भारी वाटले रे बाबा " ! असे एकमेकांना म्हटल्याचे अजून ही आठवते. त्यावेळी बस स्थानक असो किंवा गावात असो सगळीकडे हॉटेल होती. पंजाबी ढाबे येण्यास खूप काळ जायचा होता. एव्हडच काय खानावळीत भोजन मिळे "..पण हॉटेलमध्ये "राईस -प्लेट सुरु झालेली नव्हती "

पुरी-भाजी, आलूबोंडा मिसळ, शेव आणि चिवडा, भज्जे, पेढा, बालुशाही, बासुंदी, कलाकंद " यांच्या सोबत नाष्टा " हीच सगळ्यांची "चैन आणि ऐश "करण्याची परमावधी असे. त्यामुळे ..आमच्या सारख्या पोरांचा पुढचा सगळा प्रवास हॉटेलातील अशा टेस्टी फराळावर होत असे.

परभणी -औरंगाबाद या रस्त्य्वरच्या रेल्वे आणि बस प्रवासाची आम्हाला सवय. त्यावेळची रेल्वे आणि बस "दोन्ही तिकिटे आजच्या पेक्षा खूप म्हणजे खूपच कमी होते. तसेच त्यावेळचे आमचे पगार किती आकडी होते? हे न सांगितलेले बरे. कमी पगाराच्या नोकऱ्या असणारी पब्लिक मोठ्या संख्येने असायची. त्यामुळे ..पैश्यांची सोय झाल्याशिवाय गावाला जाणे किंवा प्रवासाला निघणे. स्वप्नवत कल्पना असायची. त्यानंतर अनेक वेळा पारिवारिक दर्शन -यात्रा झाल्या अजूनही होत आहेत. त्यातील दोन आठवणी महत्वाच्या आहेत.

१) धाकट्या भावाच्या लग्नानंतर देवीचा गोंधळ-जागरण राहून गेलेला होता. तो कुलाचार पूर होण्यास खूपच उशीर झाला, याची टोचणी मनाला सतत असे, यासाठी आम्ही तुळजापूर मुकामी आलो, त्यावेळी तिथल्या हैद्राबाद बँकेतील स्टाफ यांची मदत झाली.

ज्या गुरुजीकडे मुकामी होतो, त्यांनी देखील छान व्यवस्था केली होती. दुसरे दिवशी आई भवानी मातेच्या मंदिराच्या प्रांगणात गोंधळी आले आणि आणि त्यांनी संबळ, टेंभा आणि साग्रसंगीत पूजा मांडून आईची गाणी म्हणून गोंधळ पार पडला. आणि आमच्या मनातील "गोंधळ "आई भवानीच्या कृपेने शांत झाला.

२) २००० साली मी माझ्या फमिली सहित एल एफ सी घेऊन पहिल्यांदा कार घेत दर्शन यात्रा केली निम्मित होते. श्रीसंतदासगणू वांग्मय दर्शन "या माझ्या त्या वर्षी प्रकाशित झालेल्या पुस्तकाच्या प्रती मी सगळ्या क्षेत्री श्रीचरणी अर्पण करीत

माझा संकल्प पूर्ण केला. त्यातीलच तुळजापूरला दर्शनाला येऊन आई भवानीच्या चरणी माझे पुस्तक "ठेवल्यावर ..आईच्या चरणी असलेली फुले "माझ्या हातात प्रसाद म्हणून दिली ", अजून ही त्या आठवणीने मन मोहरून येते.

मित्र हो ..माझ्या या आठवणींच्या जागर मध्ये "तुमची सोबत असू द्या .

### जागर देवी दर्शनाचा


अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# प्रीतम मुंडेंचे विधान चर्चेत : पंकजाताई पुन्हा एकदा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून...

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** भारतीय जनता पार्टीच्या नेत्या आणि माजी मंत्री पंकजा मुंडे मागील काही महिन्यांपासून नाराज असल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. पंकजा मुंडे यांचे पक्षाअंतर्गत खच्चीकरण केले जात असल्याचीही चर्चा आहे. यामुळे पंकजा मुंडे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये रोष आहे. असे असताना भाजपाच्या खासदार प्रीतम मुंडे यांचे एक विधान चर्चेत आले आहे.

पंकजा मुंडे पुन्हा एकदा बीड जिल्ह्याला पालकमंत्री म्हणून लाभाव्यात, असे विधान प्रीतम मुंडे यांनी केले आहे. त्या बीडमध्ये एका कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाला भाजपाचे अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.




यावेळी उपस्थितीतांना संबोधित करताना प्रीतम मुंडे म्हणाल्या की, बीड जिल्ह्यात काही वर्षांपूर्वी जसे होते, त्यापेक्षा अधिक चांगले बनवण्याचा प्रयत्न पंकजा मुंडे पालकमंत्री असताना त्यांच्या माध्यमातून केला आहे. मागील पाच वर्षात अंबाजोगाई शहराला चारही बाजुंनी राष्ट्रीय महामार्गांनी वेढण्याचे काम करण्यात आलं आहे. मी हे यासाठी सांगतेय की, आपण जेवढ्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देऊ, तेवढ्या मोठ्या प्रमाणात उद्योगाला चालना मिळते. त्यामुळे येथून पुढच्या काळातही आपण असं काम करतच राहू. यासाठी पंकजा मुंडे पुन्हा एकदा आपल्याला बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून लाभाव्यात. ज्यामुळे मागील काही काळात बीड जिल्ह्याचा जो अनुशेष बाकी राहिला आहे. तो त्यांच्या माध्यमातून भरून निघेल. यासाठी पंकजाताई तुम्हाला आणि तुमच्यापेक्षा जास्त जिल्ह्याला शुभेच्छा देते, असं विधान प्रीतम मुंडे यांनी केले आहे.

# ॲड. अक्षय बाहेती यांच्या रक्तदानाच्या विक्रमाची जागतिक विक्रम म्हणून नोंद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** ॲड. अक्षय बाहेती यांच्या रक्तदानाच्या जागतिक विक्रमाची नोंद इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड आणि वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये करण्यात आली.



ॲड. अक्षय बाहेती यांनी अवघ्या ३१ वर्षांच्या वयात तब्बल ५० वेळा रक्तदान केले आहे. ज्या वयात युवक रक्तदानाला सुरवात करतात त्या वयापर्यंत ॲड. अक्षय बाहेती यांनी ५० वेळा रक्तदान करून जागतिक विक्रमाला गवसणी घालणे हे खरच अभिमानास्पद बाब आहे. आज प्रत्येक गोष्टीला पर्याय आहे पण रक्ताला अजून पर्याय निर्माण झालेला नाही म्हणून रक्तदानाचे महत्त्व हे सर्वात मोठे आहे. ॲड. अक्षय बाहेती हे आता जागतिक पातळीवर सर्वात तरुण रक्तदान विक्रमवीर ठरले आहे. ॲड. अक्षय बाहेती यांनी आतापर्यंत अनेक रक्तदान शिबीरांचे आयोजन करून मोठया प्रमाणात रक्त पिशव्यांचे संकलन करून सामाजिक दायित्व उत्तमरीत्या पार पाडले आहे. जेव्हा ही कोणाला रक्ताची गरज भासते तेव्हा रक्त उपलब्ध करून देण्या साठी ॲड. अक्षय बाहेती हे तत्पर असतात. रक्तदाना बरोबरच ॲड. अक्षय बाहेती हे अपघातग्रस्तांना वाचविण्याच्या सामाजिक कार्यात ही अग्रेसर आहे. यापुर्वी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड आणि ओएमजी बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये ॲड. अक्षय बाहेती यांच्या रक्तदानाच्या विक्रमाची नोंद झाली आहे. आता जागतिक पातळीवर विक्रमाची नोंद झाल्याबद्दल विविध स्तरांवरून ॲड. अक्षय बाहेती यांचे विशेष अभिनंदन केले जात आहे.

# वीजचोरीविरोधात महावितरणची धडक मोहीम

## मीटरमध्ये फेरफार करणाऱ्या ११७ जणांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वीजचोरीला आळा घालण्यासाठी महावितरणने राबवलेल्या धडक मोहिमेत मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी केल्याची ११७ अधिक प्रकरणे शहरात उघडकीस आली आहेत. या सर्वांवर विद्युत कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. महावितरणच्या मोहिमेमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे.

औरंगाबाद व जालना जिल्ह्यात वीजचोरीविरोधात महावितरणने जोरदार मोहीम उघडली आहे. यात अधिक हानी असलेल्या वीज वाहिन्यांवरील भागात विशेष मोहीम राबविली जात आहे. त्यासाठी प्रत्येक वाहिनीवर दोन ते तीन पथके तैनात करण्यात आलेली आहेत. तसेच याकामी भरारी पथकांचेही सहाय्य घेतले जात आहे. शून्य, १ ते ३०, ३१ ते ५० तसेच ५१ ते १०० युनिट वीजवापर असलेल्या वीजग्राहकांची पडताळणी केली जात आहे. तसेच वीजचोरीची गुप्त माहिती व तक्रारींवरही कार्यवाही केली जात आहे. यात संशयास्पद मीटर जप्त करून महावितरणच्या प्रयोगशाळेत तपासणी केली जात आहे.

औरंगाबाद शहरात राहुलनगर, रोशनगेट, गणेश कॉलनी, जकात नाका, जसवंतपुरा, मोंढा व निजामुद्दिन या विद्युत वाहिन्यांवर १ सप्टेंबरपासून राबवलेल्या मोहिमेत वीजचोरीचा संशय असलेले १४९ मीटर जप्त करण्यात आले. तपासणीअंती यातील ११७ मीटरमध्ये ग्राहकांनी फेरफार करून जवळपास एक लाख युनिटची वीजचोरी केल्याचे निष्पन्न झाले. या ग्राहकांवर विद्युत कायद्याच्या कलम १३५ अन्वये कारवाई कारवाई करण्यात आली आहे. वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

या सर्व ग्राहकांना वीजचोरीची बिले देण्यात देण्यात येणार असून, ही बिले त्यांनी २४ तासांत भरणा न केल्यास त्यांच्याविरुद्ध पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. तसेच वीजचोरीचे बिल भरेपर्यंत त्यांचा वीजपुरवठा सुरळीत केला जात नाही, असे महावितरणच्या सूत्रांनी सांगितले.



दरम्यान, औरंगाबाद शहरासह ग्रामीण भागात व जालना जिल्ह्यातही महावितरणची वीजचोरीविरोधातील धडक मोहीम यापुढेही सुरूच राहणार आहे. ग्राहकांनी अधिकृत जोडणी घेऊनच वीज वापरण्याचे आवाहन महावितरणने केले आहे. न्यायालयात वीजचोरीचा गुन्हा सिद्ध झाल्यास तीन वर्षापर्यंत तुरुंगवास किंवा जबर दंड किंवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

# शाळेची बस आंबेगाव येथे दरीत कोसळली

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जिल्ह्यातील आंबेगाव येथे खासगी शाळेच्या बसचा दरीत कोसळून अपघात झाल्याची घटना घडली आहे. चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने बसला हा अपघात झाला आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. ही घटना पुण्यातील घोडेगाव परिसरात घडली आहे. या बसमध्ये एकूण ४४ विद्यार्थी आणि ३ शिक्षक असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. ४४ पैकी चार विद्यार्थ्यांना मंचर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याच्या आंबेगाव तालुक्यातील मुक्ताई प्रशाला पिंपळघोडे येथील शाळेची बस ४४ विद्यार्थी आणि ३ शिक्षकांना घेऊन गिरवली येथील आयुका दुर्बीण पाहण्यासाठी गेली होती. तेव्हा, एका वळणावर बस चालकाचे नियंत्रण सुटून बस थेट दरीत कोसळली.

# लासूर स्टेशन परिसरात भगरीतून विषबाधा

## शिल्लेगाव, सिद्धनाथ वाडगाव, सावंगी, गोपाळवाडी येथील रुग्णांचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन परिसरातील शिल्लेगाव, सिद्धनाथ वाडगाव,सावंगी,येथील नागरिकांनी नवरात्री सुरु झाल्याने नवरात्रीचा उपवासासाठी भगरीचा भात व भगरीच्या भाकरी फराळासाठी खालल्या मात्र काही वेळातच त्यांना उलटी, मळमळ, पोट दुखणे,संडास असा त्रास होण्यास सुरुवात झाली म्हणुन नातलगाणी लासूर स्टेशन येथील खासगी रुग्णालयात दाखल केले असून सगळ्यांची प्रकृती आत्ता उत्तम आहे यामध्ये लहान मुलाचाही समावेश आहे.

दरम्यान दुसऱ्या दिवशीही लासूर स्टेशन परिसरातील डोणगाव रोडवरील हनुमान मंदिराजवळील चार नागरिकांना नवरात्रीचा उपवासासाठी भगरीचा भात व भगरीच्या भाकरी फराळासाठी खालल्या मात्र त्यांना उलटी, मळमळ, पोट दुखणे, संडास असा त्रास होण्यास सुरुवात झाली म्हणुन नातलगांनी लासूर स्टेशन येथील खासगी रुग्णालयात दाखल तातडीने दाखल केले आहे.



अन्न, भेसळ प्रशासनाने तात्काळ लासूर स्टेशन येथील विविध ठिकाणी उपचार घेत असलेल्या रुग्णाची विचारपूस करून नोंद करून घेतली या मधील बहुतेक भाविकांनी सावंगी चौकातील एका व गीताबान येथील एका अश्या दोन दुकानातून भगर व भगरीचे पीठ खरेदी केले असल्याचे सांगितले मात्र यावेळी अन्न, औषध व भेसळ प्रशासनाच्या पथकला नागरिकांनी धारेवर धरले यावेळी रुग्णांशी बोलताना पथकातील एका महिला अधिकाऱ्यांची जीभ घासरली व त्या बोलताना म्हणाल्या कीं काय खावे हे अजूनही लोकांना कळत नाही यामुळे मात्र उपस्थित रुग्णांच्या नातेवाईकांचा पारा चढला त्यानी सर्व उपस्थित अधिकाऱ्यांची चांगलीच कानउघडणी केली व तुम्ही घटना घडायच्या आगोदर तपासन्या का करत नाही असे सुनावले व तुम्ही काहीच करू शकत नाही असे म्हणून लिहिलेला पंचनामा एक्का रुग्णच्या नातेवाईकांने चूरगाळून फेकला. यातील बहुतेक नागरिकांना मात्र भग्रीच्या पिठाच्या भाकरीमुळे जास्त त्रास होत होता आता बहुतेक रुग्णांची प्रकृर्ती उत्तम्म आहे.



# राजकीय पर्वणी

आधुनिक केसरी

दिल्लीमध्ये सणांचा महिनाभराच्या हंगामाला दसऱ्यापासून सुरुवात होते. त्यानंतर दिवाळी येते आणि हंगामाची सांगता छठपूजेने होते. लोकांसाठी सणासुदीत आनंद व्यक्त करण्याची, व्यापाऱ्यांसाठी पैसा कमावण्याची आणि दिल्लीतील लोकप्रतिनिधींसाठी राजकीय पोळ्या भाजण्याची संधी मिळते. दिवाळीच्या धावपळीत फटाक्यांच्या बंदीवर राजकारण करण्याआधी दसऱ्याच्या दिवशी रामलीलेत सहभागी होताना राजकारणी दिसतात. गेल्या काही वर्षांत आम आदमी पार्टी (आप) आणि दिल्ली भाजपमध्ये छठ पूजेदरम्यान संघर्षही झाला आहे. यावर्षी, ज्याला उत्सवाचे राजकारण म्हणता येईल ते आधीच सुरू झाले आहे. भाजप खासदार मनोज तिवारी यांनी दिवाळीदरम्यान दिल्लीत फटाक्यांच्या बंदीच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. ईशान्य दिल्लीचे खासदार म्हणाले, पुन्हा एकदा अरविंद केजरीवाल यांनी औरंगजेबाप्रमाणेच मनमानी ब्लँकेट बंदी घातली. कोविड १९ च्या धक्क्यानंतर व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे कारण यामुळे त्यांच्या उपजीविकेला बाधा येईल. प्रदूषणाचे कारण देत दिल्ली सरकारने १ जानेवारी २०२३ पर्यंत ग्रीन फटाक्यांसह सर्व प्रकारच्या फटाक्यांच्या उत्पादनावर, विक्रीवर आणि वापरावर पूर्ण बंदी घातली आहे. दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय यांनी याआधी सांगितले की, हिवाळ्यात दिल्लीचे प्रदूषण बिघडवण्यात फटाक्यांमधून उत्सर्जन हा एक महत्त्वाचा घटक असल्याचे दिसते. अशी परिस्थिती पाहता फटाक्यांचे उत्पादन, साठवणूक, विक्री आणि वापरावर पूर्ण बंदी घालण्यात येत आहे, जेणेकरून लोकांचे प्राण वाचू शकतील. परंतु, फटाके वाजवणे हे प्रदूषणाचे प्रमुख कारण नसल्याचा दावा तिवारी यांनी केला. आता आम आदमी पक्षाकडे पंजाबमध्ये सत्ता नाही आणि त्यामुळे ते काहीही करू शकत नाही, अशी सबब नाही. भाजपा खासदार म्हणाले की सरकार कमीत कमी प्रदूषण करणाऱ्या ग्रीन फटाक्यांना परवानगी देऊ शकते. एका समुदायाला खूश करण्यासाठी हिंदू, शीख आणि ख्रिश्चनांच्या सणांना लक्ष्य का केले जात आहे? असा सवाल तिवारी यांनी केला. गेल्या वर्षीही दिल्ली सरकारने १ जानेवारी २०२२ पर्यंत फटाक्यांवर पूर्ण बंदी घालण्याची घोषणा केली होती, त्याला भाजपा नेत्यांनी विरोध केला होता. कपिल मिश्रा यांचाही आरोप होता की, हिंदूंना टार्गेट करणे सर्वात सोपे आहे. मात्र, फटाक्यांवर बंदी आणणारे 'आप'च्या नेतृत्वाखालील प्रशासनाने एकटेच नाही. शेजारील हरियाणा, ज्यामध्ये भाजपची सत्ता आहे, राष्ट्रीय राजधानी क्षेत्र एनसीआरमधील १४ जिल्ह्यांमध्ये फटाक्यांच्या विक्रीवर किंवा वापरावर बंदी घातली आहे, तर उत्तर प्रदेशने दिवाळीला फक्त दोन तासांसाठी पर्यावरणाला हानिकारक नसलेले फटाके वापरण्यास परवानगी दिली आहे. या निर्बंधांना न जुमानता दिल्ली, नोएडा, फरिदाबाद आणि गुरुग्राममध्ये रात्री उशिरापर्यंत लोक फटाके फोडतात. परिणामी उत्सर्जनाने राष्ट्रीय राजधानीचा २४ तासांचा सरासरी हवा गुणवत्ता निर्देशांक दुसऱ्या दिवशी ४६२ वर ढकलला गेला जो पाच वर्षांतील सर्वोच्च आहे.



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

# नवरात्रातील आनंदोत्सव-गरबा

आधुनिक केसरी

संस्कृतीत अत्यंत श्रीमंत असलेल्या आपल्या भारतात काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत आणि त्रिपुरा, आसाम ते महाराष्ट्र, गुजरातपर्यंत समाज विविध उत्सवात रंगलेला असतो. विविध ऋतूत येणारे वेगवेगळे उत्सव, त्या-त्या देवाला वाहिलेली भक्तीची आणि कार्यक्रमांची मोहक ऋतूकालोत्भव पुष्प संकृतीसोबतच त्या भागातील संगीत, लोककला यांच्या जोडीला उत्साह आणि भक्तीला उधाण आणतात.

ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु ।
सह वीर्यं करवावहै ।
तेजस्विनावधीतमस्तु ।
मा विद्विषावहै ॥

हे प्रभू,आम्ही आपसात मिळून धर्म, भाषा व संस्कृतिची रक्षा करू शकू असे एकमेकांची रक्षा करण्याचे सामर्थ्य आम्हाला दे. कुण्या शत्रूला न घाबरता आमचे शिक्षण आम्हाला एकतेच्या सूत्रात बांधून वाईट गोष्टींपासून मुक्त करो आम्ही परस्परांवर विश्वास ठेवू अशी शक्ती आम्हास प्रदान कर. यजुर्वेदातील वरील मंत्र फक्त वेदात न राहता भारतातील जनमानसात सामावला अन प्रत्यक्ष समाज त्याला जगतोय ते या उत्सवांमुळेच. नृत्य, नाट्य, गायन, वादन, चित्रकला, पाकशास्त्र यासारख्या असंख्य कला या दिवसात उत्सवांभोवती फेर धरून नाचत असतात. काही पारंपरिक लोककला, लोकसंगीत काळाच्या ओघात पुसट होत चालले असले तरी काही मात्र तरुणाईने स्वीकारल्यामुळे नुसतेच उजळून निघाले नाहीत तर एका राज्यापुरते मर्यादित न राहता पूर्ण देशाचे होऊन गेले आहेत. गुजरातचा गरबा हा त्यापैकीच एक.

गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडल्यावर अवघ्या महाराष्ट्राला नवरात्राचे वेध लागले आहेत. नवरात्रीच्या गरब्याचा आवाज गल्लीबोळात घुमणार जल्लोषात साजरा करायला उत्सुक आहे. गरबा हा नवरात्र उत्सवाची ओळख बनत चालला आहे. वर्षभर लोक गरबा आयोजन होते धमाल करता येते म्हणूनही नवरात्राची वाट पाहत असतात. यात अंबा मातेचे आवाहन केले जाते. हर्षोउल्हासात सामूहिक उत्सवाच्या स्वरूपात गरबा खेळल्या जातो.गरबा या नृत्याद्वारे देवीची आळवणी करून जगतासाठी सुख समृद्धी मागितली जाते.

गरबा गुजरात मधील एक लोक नृत्य असून गुजरात मध्ये याचा उच्चार गरभो असा करतात. आज हे नृत्य आपल्या काही वैशिष्ट्यांनी आधुनिक नृत्यकलेत स्थान मिळून बसले असले तरी त्याचे वास्तविक स्वरूप लोकनृत्यात्मकच आहे. गरबा राजस्थान आणि माळवा या प्रदेशातही प्रचलित आहे, पण त्याची जन्मभूमी मात्र गुजरात हीच आहे.

पूर्वी नवरात्रात देवी जवळ सच्छिद्र घटात अखंड दीप लावून ठेवीत. त्याला दीपगर्भघट म्हणत. दीपगर्भास स्त्रीच्या सृजनशक्तीचे, मातृशक्तीचे प्रतीक मानून पूजा केली जाते. या दीपगर्भ शब्दातील काही वर्णांचा लोप होऊन गरबा हा शब्द राहिला. सांप्रत



गुजरातमधील मुली नवरात्राच्या दिवसात पांढऱ्या मातीचा एक सचिद्र घडा फुलपत्तीने सजवून त्याच्याभोवती फेर धरतात व तो डोक्यावरही घेऊन नृत्य करतात, म्हणून या नृत्याला गरबा नृत्य असे नाव मिळाले. गरबा हे एक सौभाग्यप्रतिकही आहे.

आश्विनमासात नवरात्राच्या दिवसात गरबा हा नृत्योत्सव होतो. नवरात्रीच्या पहिल्या रात्री गरब्याची स्थापना होते. मातीचे दोन लहान मोठे घट एकावर एक ठेवतात व वरच्या घटावर पणती ठेवून त्यात चार ज्योती पाजळतात. गरब्याची स्थापना झाल्यावर स्त्रिया त्याच्या भोवती टाळ्या वाजवीत फेर धरतात. या खेळाचे चुटकीचा, टाळीचा, ओजलचा, खंजिरीचा, मंजिरीचा, गडव्यांचा असे अनेक प्रकार आहेत. वर्तुळात फिरताना जोड्या चौकड्या असे विविध प्रकारचे स्त्रियांचे गट बनतात. फेर धरताना बायका गाणीही म्हणतात. प्रत्येक रात्री कमीत कमी पाच तरी गाणी गायिलीच पाहिजेत, असा नियम आहे. गरब्याच्या वेळी देवीचे गीते गातात, त्याचप्रमाणे कृष्णलिलेचेही गाणे गातात. मिरेप्रमाणे एखादी सामान्य स्त्रीही गोकुळातल्या कानाला 'कलेजारी कोर' म्हणजेच काळजाचा तुकडा समजते.

उदाहरणार्थ तांबा का लोट्या भरया जलसे रे ।
पीवानो बालो परदेश छे रे ।
बई, म्हारो कान्हो कलेजा री कोर छे रे । कोर छे कोर छे कोर छे रे ।
बई, म्हारी सोना री अंगुठी उपर मोर छे रे ।

म्हणजेच तांब्याचा लोटा पाण्याने भरला; पण ते जल पिणारा मात्र परदेशात आहे. बाई, माझा कान्हा माझ्या काळजाचा तुकडा आहे. बाई, माझ्या सोन्याच्या अंगठीवर मोर आहे. माझा कान्हा कलेजारी कोर (काळजाचा तुकडा) आहे.

गरबा व गरबी असे गरब्याचे दोन प्रकार आहेत मध्ययुगीन व अर्वाचीन गुजराती वाङ्मयात हे दोन्ही शब्द नेहमीच येतात. गरबी हा शब्द सर्वप्रथम १७ व्या शतकात भाणदास यांनी वापरला. नरसी मेहताची पदे गरबी या सदरातच मोडतात. गरबी ही सामान्यतः वैष्णवांची असल्यामुळे त्या गीतात राधा कृष्णाचे वर्णन असते. दयाराम या कवीश्रेष्ठाने बहुसंख्य गरब्या लिहिल्या आहेत, त्याला गरबीसम्राट असेही म्हणतात. गरबा हा सामान्यतः शाक्त-शैवांचा समजतात. गरब्याची गीते अंबाजी, बहुचरा, काली या दुर्गारुपांच्या स्तवनांची असतात. गरबा आणि गरबी यांच्या गायन पद्धतीतही भेद आहे. कित्येक वेळा स्त्री-पुरुष एकत्र एका सुरात गरबे गातात. गरबा हे गुर्जर-सौराष्ट्राचे लोकप्रिय नृत्य-गीत आहे. समाजाच्या सर्व थरात गरब्याची वेगवेगळी गाणी आहेत.

गरबा हा गुजरातच्या लोकजीवनाचा सामूहिक उल्लास आहे. लोक जीवनाचे प्रत्येक अंग या गीतातून मुखरित झाले आहे. सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक पौराणिक असे अनेक विषय गरब्यामध्ये शब्दांची लेणी लेवून झंकारले जातात.

गरबा चे स्वरूप दिवसेंदिवस बदलत चालले असून हल्ली मोठमोठ्या गरबा समारंभाचे आयोजन केले जाते. गरबा वर लिहलेल्या गाण्यांचे खास अल्बम बनविले जातात. त्या गाण्यांना नृत्याच्या वेळी प्रसिद्ध गीतकार सादर करतात. नवरात्राच्या काही दिवस अगोदरपासूनच नृत्याचे स्पेशल क्लास घेतले जातात. त्यासाठी डिझाइनर ड्रेसेस सुद्धा घेतले जातात. भारतातल्या विविध भागातच नव्हे तर विदेशात सुद्धा गरबा आयोजन केले जाते. मोठमोठ्या कंपन्या यासाठी प्रायोजक बनतात. झगमगाट, गरबा संगीत याने आजूबाजूचा परिसर दणाणून निघतो. खाण्या-पिण्याचे पदार्थांची, विविध वस्तू विक्रेत्यांची रेलचेल असते.

गरबा हा अतिशय आनंददायी लोकनृत्य प्रकार आहे! देशातल्या कुठल्याच लोकनृत्यप्रकाराने इतकी लोकप्रियता मिळवली नसावी. गरबा हे महाराष्ट्र राज्याचे लोकनृत्य नसले तरी इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्राने त्याला उदारमताने स्वीकारले आहे हे ही तितकेच खरे आहे. आपली संस्कृती, परंपरा पुढच्या पिढीपर्यंत पोहचवण्यासाठी आपल्या स्थानिक लोककला, लोकनृत्य सर्वांनीच जपायला हवीत.

नवरात्र हा आदिशक्तीच्या अस्था, भक्ती, आराधनेचा उत्सव असून, मातेची स्तुती व गुणगान गायनासाठी केल्या जाणाऱ्या भक्तिमय नृत्याला बॉलिवूडचे निर्लज्ज गाणे, अश्लील हरकती, तोकडे कपडे यांनी नासवल्या जाऊ नये याची दक्षता प्रत्येकाने घ्यायला हवी.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# गान कोकिळा : लता मंगेशकर

आधुनिक केसरी

लता दिदींशीवाय भारतीय चित्रपट सृष्टीचा आणि संगीत कलेचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. आपल्या अलौकिक स्वरांनी चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर संपूर्ण देशावर वेगळा ठसा उमटवणाऱ्या लता दिदींचे संगीत क्षेत्रातले योगदान पुढील १०० पिढ्यांना विसरता येणार नाही.जगभरातील कोट्यवधी संगीत प्रेमींच्या कानाला तृप्त करणारा दैवी स्वर आज हरपला असला तरी त्यांच्या आवाजाच्या परिसस्पर्शाने अजरामर झालेल्या गीतांच्या माध्यमातून हा स्वर अनंतकाळ आपल्या मनामध्ये गुंजन करत राहणार आहे. दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल ? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली.

लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकरांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन - मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले



आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली. मराठी, हिंदीसह २० हुन अधिक प्रादेशिक भाषेत त्यांनी गाणी गायली. मधुबाला, नूतन, मीना कुमारी पासून श्रीदेवी, माधुरी, जुही ते काजोल, करिश्मा, करीना कपूरपर्यंत सर्व अभिनेत्रींना त्यांनी आवाज दिला. त्यांच्या गायन कलेची दखल घेऊन सरकारने त्यांना अनेक मानाचे पुरस्कार दिले. १९६९ साली भारत सरकारने त्यांना देशाचा सर्वोच्च तिसरा नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन गौरवले. १९९९ साली देशाचा सर्वोच्च दुसरा नागरी पुरस्कार पद्मविभूषणने गौरविण्यात आले. २००१ मध्ये त्यांना त्यांच्या संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल भारतरत्न या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविण्यात आले. एम एस सुब्बालक्ष्मी नंतर या पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या त्या केवळ दुसऱ्या गायिका होत्या. त्यांना दादासाहेब फाळके हा चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार देखील मिळाला आहे. फ्रांस सरकारने ऑफिसर ऑफ लिजन ऑफ ऑनर या त्यांच्या सर्वोच्च नागरी पुरस्काराने त्यांना गौरविले आहे. लता दिदींना तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअरचा पुरस्कार मिळाला. फिल्मफेअर कडून त्यांचा दोनदा विशेष सन्मान करण्यात आला. कालांतराने त्यांनी नवीन गायकांना पुरस्कार मिळावा या हेतूने पुरस्कार स्वीकारणेच सोडून दिले. १९९२ साली महाराष्ट्र राज्य सरकारने लता मंगेशकर यांच्या नावाने पुरस्काराची सुरवात केली तर मध्यप्रदेश सरकारने १९८४ सालापासूनच लता मंगेशकर पुरस्कार देण्याची परंपरा सुरू केली. लता दिदींना अनेक विद्यापीठांनी मानाची डिलीट पदवी देऊन गौरविले. यावर्षी ६ फेब्रुवारी रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. त्यांच्या निधनाने केवळ भारतातच नव्हे तर जगभर हळहळ व्यक्त केली गेली. त्यांच्या निधनाने एका दैवी युगाचा अंत झाला असे मानलं गेले.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# देवीची साडेतीन शक्तिपीठे



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**अष्टविनायक, बारा ज्योतिर्लिंग, तसेच चारधाम आहेत. तसेच महाराष्ट्रात देवीची साडेतीन शक्तीपीठ प्रसिद्ध आहेत. श्री महालक्ष्मी (अंबाबाई) कोल्हापूर, श्री रेणुका माता, माहूर व श्री तुळजाभवानी, तुळजापूर ही पूर्ण, तर श्री सप्तशृंगी वणी हे अर्धे शक्ती पीठ आहे. नवरात्रात या सर्व ठिकाणी भाविकांची दर्शनासाठी गर्दी असते. दर्शनाने मनाला खूपच समधान मिळते. ऊर्जा मिळते. म्हणूनच ज्याची जी कुलदेवी आहे, ते वर्षा-दोन वर्षांत कुलद्देवीच्या दर्शनासाठी जातात. जाणे झाले नाही तर गावातील मंदिरात जाउन, पातळ, खणा-नारळाने ओटी भरतात. नवरात्री उत्सवात या शक्तिपिठांचे दर्शन खूपच फलदायी असते.**

## अंबाबाई कोल्हापूर

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपिठांपैकी पहिले शक्तिपीठ कोल्हापूर येथे आहे. हे पूर्ण शक्तिपीठांपैकी एक असून या मंदिराचे बांधकाम कोणी केलं, याबाबत अद्याप कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नाही. काही संशोधकांनी केलेल्या संशोधनातून असा निष्कर्ष काढला की, शिलाहार राजवटीपूर्वी कार्हारक (सध्याचे कराड) या प्रांतातील सिंध वंशातील राजाने हे मंदिर बांधले असावे. या मंदिराच्या मुख्य वास्तूचे दोन मजले आहेत. या मंदिराचे संपूर्ण बांधकाम कोल्हापूरच्या आजुबाजूला मिळणाऱ्या काळ्या दगडामध्ये करण्यात आलेले आहे. हे मंदिर पश्चीमाभूख असून याच्या प्रवेशद्वाराजवळ नगरखाना देखील आहे. या मंदिरातील महालक्ष्माची मूर्ती 1.22 मीटर उंच असून 0.91 मीटर उंच दगडावर ठेवण्यात आली आहे. या मंदिरामध्ये गरुड मंडप इत्यादी कोरीव केलेल्या कलाकृती आहेत.

कधीकाळी मोगलांनी या देवळाचा विध्वंस केला तेव्हा देवीच्या पुजाऱ्यांनी अनेक वर्ष ही मूर्ती लपवून ठेवली होती असे म्हणतात. पुढे संभाजी महाराज यांच्या कारकिर्दीत मंदिराचे पुनर्जिवन जीवन करण्यात आले. (सतराशे 15 ते सतराशे 22 या काळात) महालक्ष्मी हे जागृत देवस्थान त्यामुळे बाळाजी बाजीराव पेशव्यांची बायको गोपिकाबाई हिने नवस फेडण्यासाठी जवळपास पाव किलो वजनाचे सोन्याचे चार चूडे वाहिल्याचा उल्लेख सापडतो. शुक्रवार मंगळवार व अश्विन कार्तिक मार्गशीर्ष माघ पौर्णिमेस पालखी निघते. नवरात्रात नऊ दिवस देवीची वाहन पूजा बांधतात. अष्टमीला नगरप्रदक्षिणा होते. 31 जानेवारी आणि 9 नोव्हेंबर रोजी सूर्याची किरणे दरवाजा तून थेट महालक्ष्मीच्या पायावर पडतात 1 फेब्रुवारी आणि दहा नोव्हेंबर रोजी ही किरणे देवीच्या छातीपर्यंत पोहोचतात व 2 फेब्रुवारी आणि 11 नोव्हेंबर रोजी मावळत्या सूर्याची किरणे देवीच्या पूर्ण अंगावर पडतात. या सोहळ्याला महालक्ष्मीचा किरणोत्सव म्हणतात. हा उत्सव मोठ्या उत्साहात पार पाडला जातो. कोल्हापूरला भक्तांसाठी महालक्ष्मी धर्मशाळा आहे. तसेच जवळपास तसेच गावात राहण्याची जेवण्याची व्यवस्था आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे रेस्ट हाऊस आहे रेल्वे व बस लक्झरी सेवा भरपूर आहे.

## श्री क्षेत्र तुळजापूर, तुळजाभवानी

शक्तिदेवतेच्या पीठापैकी साडे तीन पीठे महाराष्ट्रात आहे. त्यातील श्री क्षेत्र तुळजापूर हे पूर्ण व आद्यपीठ मानले जाते. महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यात वसलेले तुळजापूर हे महत्वाचे तीर्थक्षेत्र असून त्याठिकाणी तुळजाभवानी देवीचे प्राचीन मंदिर आहे. स्कंद पुराणातील सह्याद्री विभागात या देवतेची कथा आहे. कृतयुग युगात जेव्हा ऋषी कर्दमाची पत्नी अनुभूती ध्यान करत होती. तेव्हा कुकर राक्षसाने तिला मारण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तिला स्वतः ला त्या राक्षसापासून वाचवण्यासाठी तिने भगवती देवीचा धावा केला.त्यावेळी देवी भगवती प्रकटली आणि त्याच्याशी लढाई करून त्या राक्षसाला ठार मारले. त्यानंतर अनुभूतीच्या विनंतीमुळे देवी डोंगरावर राहण्यास तयार झाली. या देवीला तुर्जा-तुळजा (भवानी) असेही म्हटले जाते. या देवीचे जे भक्त तिचा धावा करतात, त्यांची इच्छा देवी पूर्ण करते. देवीचे मंदिर बालाघाटावरील एक डोंगरमाथ्यावर आहे मंदिराच्या काही भागांची बांधणी हेमाडपंती आहे. महाराष्ट्रातील या देवतांना विशेष महत्त्व आहे आणि नवरात्रीचा उत्सवही जरी नऊ दिवसांचा असला तरी तुळजापुरात, हा उत्सव एकवीस दिवस चालतो. तुळजाभवानी दसरा महोत्सवात देवीची आकर्षक अलंकार पूजा असते. तुळजाभवानी देवीच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेची प्रेरणा मिळाली होती. देवीने महाराजांना दृष्टांत देऊन महाराष्ट्रावरील दुष्टचक्राचे निवारण करण्यासाठी भवानी तलवार दिली होती. अशी आख्यायिका आहे. महाराजांनी देवीला कुलस्वामिनी मानून तिची प्रतापगडावर प्रतिष्ठापना केली होती. नवरात्रात तुळजापुरला यात्रा भरते. तुळजापूर उस्मानाबाद अंतर बावीस किलोमीटर आहे सोलापूर तुळजापूर 45 किलोमीटर सोलापूर उस्मानाबाद औरंगाबाद जळगाव मुंबई पुणे कोल्हापूर बॉसची रेल्वेची सोय आहे.

## श्री रेणुकादेवी, माहूर

देवीच्या पूर्ण शक्तीपीठांपैकी माहूरची देवी रेणुकामातेचे माहुरगड एक पीठ आहे. तिला श्री परशुरामाची आई म्हणून ओळखली जाते. असे म्हणतात की हे मंदिर तेराव्या शतकात देवगिरीच्या यादव राजाने बांधले आहे. माहूर येथील किल्ल्यात देवीच्या मंदिरासह इतर देवांची देखील मंदिरं आहेत. त्यामध्ये परशुराम मंदिर, दत्तात्रय मंदिर, अनसूया मंदिर, कालिकामाता मंदिर, यांसारख्या मंदिरांचा समावेश आहे. रामगड किल्ला हा माहूरच्या जवळपास आहे आणि त्यामध्ये सुंदर कोरीव काम केलेल्या लेणी देखील आहेत. जमदग्नी यांचेकडे मनोकामना पूर्ण करणारी कामधेनु होती. जमदग्नी हे रेणुका मातेचे पती. राजा सहस्त्रार्जुन याला या कामधेनूचा मोह झाला



.त्याने जमदग्नी कडे तिची मागणी केली मात्र त्यांनी ती नाकारली, तेव्हा परशुराम हा जमदग्नी यांचा पुत्र तेथे नव्हता, हे पाहून आश्रमात हल्ला केला व जमदग्नीना ठार केले. कामधेनुला हिरावून नेले. परशुरामाला हा प्रकार कळल्यावर त्यांनी क्षत्रियांचा नायनाट करण्याची प्रतिज्ञा केली. त्याच्या अंत्यसंस्कारासाठी परशुरामाने रेणुका व जमदग्नी यांचे पार्थिव पाळण्यात बसून माहूर गडावर आला. तेथेच श्री दत्तात्रयांनी जमदग्नी वर अंत्यसंस्कार करण्याचे सांगितले. त्याच वेळी रेणुका सती गेली. परशुराम आईच्या विरहाने दुःखी झाला. तोच आकाशवाणी होऊन तुझी आई जमिनीतून वर येईल तू डोळे बंद कर डोळे उघडू नको. परंतु परशुरामाची उत्सुकता शिगेला पोहोचली डोळे उघडले. तोपर्यंत रेणुका मातेचे मुख वर आले होते. हीच तांदळा स्वरूपातली मुख असलेले माहूरची रेणुका माता होय. परशुरामाला या डोंगरावर मातेचे दर्शन झाले म्हणून याला मातापूर असेही म्हणतात. माहूर गडावर नवरात्र उत्सव, कोजागिरी पौर्णिमा, दिवाळी, शाकंभरी नवरात्र, चंपाषष्टी, मकर संक्रांत, होळी, असे सण साजरे करतात. नवरात्रातील ललिता पंचमीला देवीची अलंकार पूजा केली जाते.

मंदिर परिसरात परशुरामाचे मंदिर आहे. गडावरील मंदिरात जाण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत. तसेच वयस्कर मंडळी साठी डोली ही उपलब्ध आहे. अगदी रेणुका मातेच्या मंदिराच्या पर्यंत ते सोडतात. त्यामुळे दर्शन सहज संस्थेने घेता येते. महाराष्ट्रातील आणि कुटुंबाची ही कुलदेवता आहे त्यामुळे वर्षा दोन वर्षातून दर्शनासाठी ही मंडळी येत असतात.

माहुर हे ठिकाण नांदेड जिल्ह्याच्या किनवट तालुक्यामध्ये आहे. अकोला, अमरावती, भुसावळ, पुसद, इथून बसेस उपलब्ध आहेत. या ठिकाणी भक्त निवास खाजगी लॉजिंग बोर्डिंग, बुलढाणा अर्बन बँकेचे रिसॉर्ट आहे. गेल्या काही वर्षात इथे खूप सुधारणा झालेल्या आहेत तसेच आता रोपवे चीही सुविधा होणार आहे.

## श्री सप्तशृंगीदेवी, वणी

साडेतीन शक्तीपीठांपैकी अर्धा शक्तीपीठाचा मान हा संप्तश्रुंगीदेवीचा आहे. येथे महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या तिघींचेही हे एकच रूप आहे, असं मानण्यात येतं. पृथ्वीतलावर जंगदंबेची वेगवेगळी रूपं आहेत. त्यापैकी सप्तशृंगीदेवीचे रूप या तीन देवींचे एक रूप आहे. शुंभनिशुंभ आणि महिषासुर या राक्षसांचा वध केल्यानंतर देवी येथे तप आणि साधना करायला राहत होती. अशी आख्यायीका सांगण्यात येते. सह्याद्रीच्या उंच पर्वतरांगांमध्ये सात शिखरं आहेत. त्यावरूनच या ठिकाणाचे नाव सप्तशृंगी गड ठेवण्यात आले आहे. हिंदू पंचांगनुसार प्रत्येक नवरात्र आणि चैत्र महिन्यामध्ये येथे उत्सव भरवण्यात येतो.

सप्तशृंगीदेवी नाशिकपासून 65 किलोमीटरवरील 4800 फूट उंचीवरील सप्तशृंग गडावर वसलेली आहे. या देवीच्या मुर्तीविषयी देखील एक अख्यायिका सांगण्यात येत ती म्हणजे, एका धनगराला येथे एक मधमाशांचे पोळं दिसलं होतं. त्या धनगराने ते पोळं काठीच्या सहाय्याने काढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या काठिला शेंदूर लागला. त्याने पोळे काढल्यानंतर त्याला तिथे देवीची मूर्ती सापडली. हे मंदिर डोंगराची कपार खोदून तयार करण्यात आलेले आहे. यामध्ये महिरपीत देवीची आठ फूटाची मूर्ती अठरा भुजा मूर्ती आहे. मूर्ती शेंदूरलेपन, रक्तवर्ण असून डोळे टपोरे आहेत. यामुळे देवीचं रूप तेजस्वी दिसतं. त्याचप्रमाणे देवीचे सर्व हात एकमेकांना लागून आहेत. सर्व देवांनी महिषासुरासारख्या राक्षसाचा नाश करण्यासाठी देवीला शस्त्रही दिली आहेत. या देवी मध्ये महासरस्वती महालक्ष्मी महाकाली या आहेत. त्रिगुणात्मक स्वरूप आहे. याच गडावर मच्छिंद्रनाथ यांना देवीने शाबरी विद्या चे धडे दिले होते, त्यांची ही समाधी गडावर आहे. ज्ञानेश्वरांची ही कुलस्वामिनी आहे. त्यांचे मोठे बंधू निवृत्तीनाथ हे समाधी घेण्यापूर्वी वणी गडावर आले होते व देवी च्या आदेशानुसार त्रंबकेश्वर येथे समाधि घेतली. नवनाथांची शाबरी विद्या या देवीची देणगी आहे. मार्कंडेय ऋषींनी या देवीची स्थापना केली कशी अख्यायिका आहे. आता सप्तशृंगी गडावर भोजन निवास याची उत्तम व्यवस्था आहे. भरपूर लॉज, तसेच निवासाची सोय आहे. दर्शनाला जाण्यासाठी रोप-वे ही आहे.

अशा या देवीच्या साडेतीन शक्तिपीठाला अनेक भाविक नवरात्रात दर्शनाला जात असतात. मागील काही वर्षात मंदिरात जाऊन दर्शन घेणे शक्य नव्हते .आता मंदिरे दर्शनासाठी खुली बंधने मोकळे केले असेल तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने काही गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे.

।।जय श्री महालक्ष्मीदेवी।।
।।जय श्री रेणुका माता ।।
।।जय श्री तुळजाभवानी।।
।।जय श्री सप्तशृंगी निवासिनी।।

# नवरात्र म्हणजे शक्तीची उपासना



सुनील शिरपुरे, यवतमाळ
संपर्क क्र. 7057185479

आधुनिक केसरी

**उत्सव हे चांगल्या कार्याची सुरुवात करण्याचे निमित्त असते. त्या मुहूर्तावर चांगल्या सवयी लावून घ्याव्या, चांगल्या कार्याचा शुभारंभ करावा, चांगल्या कामासाठी योगदान देता यावे, हा शुद्ध हेतू असतो. परंतु अलीकडे विचार लक्षात न घेता केवळ ट्रेंड म्हणून अनेक गोष्टी केल्या जातात. कुणी विचारले, तर त्यामागचे कारणही सांगता येत नाही. त्यामुळे व्यक्तीचे हसे होतेच, परंतु धर्म संस्कृतीवर देखील प्रश्नचिन्ह उभे केले जाते. म्हणून एखाद्या गोष्टीचे अनुसरण करायचे असेल, तर आधी त्याची संपूर्ण माहिती करून घ्यावी आणि मगच त्यानुसार कृती करावी.**

नवरात्राचे दिवस म्हणजे शक्तीची उपासना करण्याचे दिवस. जगामध्ये कोणतीही नैतिक मूल्ये केवळ चांगल्या आहेत म्हणून टिकत नाहीत, तर त्यांचे अस्तित्त्व टिकवून ठेवण्यासाठी त्यांच्या पाठीमागे समर्थ लोकांच्या तपश्चर्येचे पाठबळ असणे आवश्यक असते. जगात तपश्चर्येला यश मिळते. ही गोष्ट सत्याच्या उपासकांनी विसरता कामा नये. तपश्चर्येच्या बळाने जगात पुष्कळ वेळा असत्य मूल्ये देखील विजयी झाली आहेत, ही गोष्ट आपल्याला उपरोक्त सत्याची अंधुक कल्पना देते. दुर्बळ लोकांचे सत्य, संस्कार किंवा संस्कृती यांची कोणी पूजा करत नाही.

अश्विन महिन्यात येणा-या या नवरात्र उत्सवाबाबत पौराणिक कथा प्रसिद्ध आहे. महिषासुर नावाचा एक राक्षस अतिशय प्रभावी बनला होता. त्याने स्वतःच्या सामर्थ्याच्या बळावर सर्वच देवांना व मनुष्यांना 'त्राहि माम्' करून सोडले होते. दैवी विचारांची प्रभा अस्पष्ट बनली होती व दैवी लोक भयग्रस्त झाले होते.

धैर्य घालवून बसलेल्या देवांनी ब्रह्मा, विष्णु, महेश यांची आराधना केली. देवांच्या प्रार्थनेने प्रसन्न झालेल्या आद्य देवांना महिषासुराचा राग आला. त्यांच्या पुण्यप्रकोपातून एक दैवीशक्ती निर्माण झाली. सर्व देवांनी जयजयकार करून ती साभाळली, तिचे पूजन केले. तिला स्वतःच्या दिव्य आयुधांनी मंडित केले. या दैवी शक्तीने नऊ दिवस अविरत युद्ध करून महिषासुराला मारले. आसुरी वृत्तीला दाबून, दैवी शक्तीची पुन्हा स्थापना करून देवाला अभय दिले. दैवी शक्ती तीच आपली जगदंबा! या दिवसात आईजवळ शक्ती मागायची व आसुरीवृत्तीवर विजय मिळवायचा. आजही महिषासुर प्रत्येकाच्या ह्रदयात स्वतःचे स्थान जमवून बसला आहे आणि आत असलेल्या दैवी वृत्तींना गुदमरवून सोडले आहे. या महिषासुराच्या मायेला ओळखले पाहिजे. तिच्या आसुरी जुलमांपासून मुक्त होण्यासाठी दैवी शक्तीच्या आराधनेची आवश्यकता आहे. नऊ दिवस अखंड दीप तेवत ठेवून आई जगदंबेची पूजा करून तिच्यापासून शक्ती प्राप्त करण्याचे दिवस म्हणजेच नवरात्रीचे दिवस!

आपली चुकीची समजूत आहे, असुर म्हणजे मोठ्या दाताचे, मोठ्या नखांचे, लांब केसांचे, मोठे डोळे असलेले कोणी भयंकर राक्षस! खरे पाहता असुर म्हणजे 'असुषु रमन्ते इति असुरः' प्राणातच रममाण होणारे, भोगातच रममाण होणारे! तसेच महिष म्हणजे रेडा. त्या दृष्टीने पाहता रेड्याची वृत्ती बाळगणारा तो महिषासुर. रेडा नेहमी स्वतःचेच सुख पाहतो. समाजात ही रेड्याची वृत्ती पसरत चालली आहे. परिणामतः संपूर्ण समाज स्वार्थी, प्रेमविरहित व भावशून्य बनला आहे. समाजात आज व्यक्तिवाद स्वार्थैकपरायणता अमर्याद बनून महिषासुर रूपात नाचत आहे. या महिषासुराच्या नाकात वेसण घालण्यासाठी आईजवळ सामर्थ्य मागण्याचे दिवस म्हणजे नवरात्राचे दिवस!

आपल्या वेदानीही शक्तीच्या उपासनेला फारच महत्त्व दिले आहे. महाभारताचे पानन् पान बलोपासना व शौर्यपूजा यांनी भरलेले आहे. व्यास, भीष्म व कृष्ण यांची सर्वच भाषणे तेज, ओज, शौर्य, पौरुष व पराक्रम यांनी भरलेली आहेत. महर्षी व्यासांनी पांडवांना शक्ती उपासनेचे महत्त्व समजावले आहे. त्यांनी पांडवांना उपदेश केला की, तुम्हाला जर धर्माची मूल्ये टिकवायची असतील तर हात जोडून, बसून चालणार नाही. शक्तीची उपासना करावी लागेल. अर्जुनाला दिव्य अस्त्र प्राप्त करण्यासाठी व्यासांनी स्वर्गात जाण्याची सूचना केली होती.

अनादी कालापासून आसुरीवृत्ती सद्विचार, दैवी विचारावर मात करत आलेली आहे आणि दैवी विचार अडचणीत येताच देवांनी भगवंताजवळ शक्ती मागितली आहे. सामर्थ्य मागितले आहे आणि आसुरीवृत्तीचा पराभव केला आहे. केवळ सद्विचार आहेत तेवढे पुरत नाहीत. त्यांचे रक्षण होणेदेखील आवश्यक आहे आणि त्यासाठी शक्तीची उपासना आवश्यक आहे.

आपणही आळस झटकून, क्षणिक प्रमादाना दूर सारत पुन्हा शक्तीची उपासना सुरू केली पाहिजे. 'संघे शक्तिः कलौ युगे' ही गोष्ट ध्यानात ठेवून नवरात्राच्या दिवसात दैवी विचारांच्या लोकांची संघटना करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या संघटनेत प्रामुख्याने जगदंबा असेल आणि तिच्या भक्तीनेच आपल्यात शक्ती प्रगट होईल हे सुचवण्यासाठी नवरात्राच्या दिवसात गरबा किंवा रास यांच्या रुपात देवीच्या भोवती फिरायचे असते. देवीच्या सभोवती फिरता फिरता सांगितले पाहिजे की, 'माते, तू आम्हाला सद्‌बुद्धी दे, आम्हाला संघबळ दे. आमच्या संघबळाच्या आड आमचा अहंकार येतो, आमची महिषवृत्ती जागृत होते, आमचे द्वेष उफाळून येतात, त्यांना तू खाऊन टाक.' आई जगदंबेची आपली ही उपासना नवरात्रात सुरू होते. पण ती केवळ नऊ दिवसांपुरती सीमित राहू नये, हे ध्यानात ठेवण्याची गरज आहे. क्षणाक्षणाची शक्ती उपासना आपल्याला जडवादी जगात उभे राहायची शक्ती प्रदान करेल. नवरात्राचे दिवस म्हणजे शक्तीच्या उपासनेचे दिवस, आईच्या पूजेचे दिवस. 'खा, प्या, मजा करा' अशा आसुरी विचारश्रेणीवर विजय मिळवण्याचा दिवस. संघशक्तीचे महत्त्व व भक्तीची महत्ता समजवण्याचे दिवस. तसेच तपश्चर्येचा महिमा व एकता यांचे महत्त्व समजवणारे दिवस. या दिवसात घुमत असलेला साधनेचा सूर पकडून जीवन समर्पणाच्या संगीताने भरून टाकायला पाहिजे.

# विविध रंगांनी सजलेले पुस्तक : 'रंगसोहळा'


आधुनिक केसरी

**विश्वास सरांच्या सिद्धहस्त लेखणीतून चितारलेले 'रंगसोहळा' हे बहुरंगी पुस्तक नुकतेच वाचनात आले. प्रत्येक लेख होता लघु निबंधासारखा, अगदी २ ते ४ पानांचा, मात्र या आशयघन लेखांत विविध तऱ्हेचे ललित, विचारप्रवर्तक आणि व्यक्तिचित्रणपर लेख दृष्टीस पडले. कुठल्या एका विशिष्ट पठडीत न बसणारे हे विविध रंगानी सजलेले पुस्तक, हीच याची ओळख आहे असे वाटते. म्हणूनच अत्यंत देखण्या अशा मुखपृष्ठात देखील रंगांची उधळण आहे अन तीही रंगसंगती साधत, रंगीबेरंगी पर्णांचे तोरण, पुस्तकाच्या शीर्षकात सामावलेले अनेकानेक रंग अन निसर्गाच्या विविध रंगानी समाहित असे रम्य रूप! पुस्तकाची सुरवातच मुळी विचारांना चालना देणारी. दोन हात जोडून केलेला साधा नमस्कार तो काय, अन आजच्या तकलादू संस्कृतीरक्षकांच्या ठायी असलेला हा कृत्रिम हास्यासोबत केलेला जणू एक औपचारिक उपचार! पण विश्वास सरांनी याच नमस्काराचे प्रेरणादायी अन भव्य रूप या लेखात रंगवले आहे.**

थोरांना केलेला, देवाला केलेला अन प्रत्यक्ष सीतेने रघुरामाला केलेला हा नमस्कार, पहिलाच अप्रतिम लेख वाचला अन शेवटचे पान येईपर्यंत वाचतच गेले. पानापानागणिक कधीही न पाहिलेले नवनवीन रंग मिळत गेले. एकंदर ३७ प्रकरणे आणि दीडशेहून अधिक पाने असलेल्या पुस्तकाचा आकार आवाक्यातला, पण त्यातला मजकूर अन अर्थ समजणे आवाक्यापलीकडले! मी कांही प्रकरणे एकाहून अधिक वेळा वाचली, तरी त्यात असलेला अभिप्रेत अर्थ अजूनही समजायचं बाकी आहे. तत्वज्ञानाचे इप्सित समजून त्याचे सार सोप्या,सरळ, सुलभ आणि रसाळ भाषेत सांगणाऱ्या अंदाजे १२ ते १४ तत्वज्ञानप्रद लेखांचा या पुस्तकात अंतर्भाव आहे. आपली संत साहित्य तसेच तत्वज्ञानाची वाचनशक्ती वारंवार अनुभवास आलेली आहेच, त्यात स्वानुभवाची जोड, यामुळे हे लेख गंभीर विषयावर असूनही, मी मात्र 'वाचू आनंदे' हाच मंत्र जपत ते वाचलेत अन अतीव आनंदाचा अनुभव घेतला. नित्य नवा दिस जागृतीचा, नीरक्षीर विवेक, माणसाची पारख, सिद्धी आणि प्रसिद्धी हे लेख अप्रतिम, पण मला भावलेले उदाहरण देते, 'श्रेयस की प्रेयस?', सर तुम्ही याचं विवेचन इतकं सुरेख केलंय , श्रेयस म्हणजे श्रेयस्कर आणि प्रेयस म्हणजे जे प्रिय ते आणि दाखला दिलाय अर्जुन आणि दुर्योधन यांचा, अर्जुनाने श्रीकृष्ण आणि दुर्योधनाने नारायणी सेना मागून अनुक्रमे श्रेयस आणि प्रेयस साध्य केले. या वरून आपण कोरोना काळात देखील याच सुंदर तत्वज्ञानाचे रूप विस्तारले. ही उदाहरणे वाचकांपर्यंत सहजरित्या नक्कीच पोचणार! हा लेख अतिशय मर्मभेदी आणि मर्मग्राही वाटला.

आपला पेशा शिक्षकाचा, त्यामुळे शिक्षण-बिक्षण, शिकण्याची प्रक्रिया, अमरावतीची शाश्वत शाळा, सुरुवात मुळापासून करावी लागेल, इत्यादी नितांतसुंदर असे आजच्या शिक्षणातील उणीवा विशद करणारे आणि त्यासोबत मुलांना आदर्श शिक्षण कसे मिळावे याची चर्चा करणारे लेख म्हणजे आपल्या शैक्षणिक पेशाच्या अनुभवाचे सार तर आहेच, पण नव्या पिढीला मार्गदर्शक असे दीपस्तंभासारखे अनुकरणीय विचारांचे लेणे देखील आहे.

पौराणिक कथा पोथीतून बाहेर याव्या अन त्यांच्यातून जीवनाची लक्ष्यप्राप्ती करणे तसेच आजच्या काळात त्या काळातील व्यक्तिरेखांपासून कुठला, कसा अन किती बोध घ्यावा, हे कठीण असूनही त्यावरचे भाष्य विश्वास सरांनी असं कांही मांडलय की, आपला या पुरातन काळातील अत्युत्कृष्ट वाङ्मयाकडे बघण्याचा दृष्टीकोणच बुरसटलेला आहे, हे ध्यानात येते. महाभारतातील युद्धः केवळ रणांगणावरचे?, बुद्धिमतां वरिष्ठम, युगायुगांचा दीपस्तंभः श्रीराम, विनाशकाले विपरीत बुद्धी ही प्रकरणे अतिशय सुरेख. श्रीराम, हनुमान, रावण, या आपल्याला ढोबळमानाने माहित




असलेल्या पात्रांबद्दल नवोन्मेषाने ऊर्जा देणाऱ्या नवीन विचारशक्तीचे विवेचन आपल्याला विचार करायला भाग पाडणारे आहे. तसेच रावणपत्नी मंदोदरी, वाली पत्नी तारा, इंद्रजिताची पत्नी सुलोचना, जालंदराची पत्नी वृंदा, हिरण्यकश्यपू ची पत्नी कयाधू, धृतराष्ट्राची पत्नी गांधारी इत्यादी खलनायकांच्या पुण्यवान आणि सुचरित्र असलेल्या पत्नींविषयीचे भाग अतिशय विचारप्रवर्तक आहेत.

पण या सर्वात मला आवडली ती, एक दिव्य स्तोत्र असूनही, घराघरात परवचा म्हटल्यासारखी बहुदा फारसा विचार न करता वाचली जाणारी अतिशय प्रसिद्ध अशी 'रामरक्षा'. तिची अवस्थाच अतिपरिचयादवज्ञा, म्हणजे जशी मलय पर्वतावरील आदिवासी गृहिणी चुलीत घालायला चंदनाची लाकडे वापरते तशीच कांहीशी झाली आहे! विश्वास सर, तुमच्या लेखांत मात्र या दिव्य चंदनाचा सुगंध इतका मनोहर रित्या पसरलाय, जणू रामनामाचा गजर दुमदुमत असलेल्या राम मंदिराच्या गाभाऱ्यातच आपण आहोत असा भास व्हावा! त्यातील नाद, अर्थ अन भाव थेट हृदयाला भिडला. या लेखातले एकैकमक्षरं पुंसा हे महापातक नाशनं करणारे आहेच पण रामनामाची अवीट गोडी आणखी 'मधुरं मधुराक्षरं' अशी झाली आहे.

परीक्षण
डॉ. मीना श्रीवास्तव
संपर्क क्र. : 9920167211

व्यक्तिरेखांचे सजीव चित्रण यात आपला हातखंडा. त्यातल्यात्यात स्वातंत्र्य वीर सावरकरांच्या येसूवहिनींच्या जाज्वल्य देशाभिमानी अन सर्वस्व त्याग करून संसाराची होळी पेटवणाऱ्या या व्यक्तिमत्वाची माहिती मला खूप अंतर्मुख करून गेली. आपण फारशी माहित नसलेली त्यांची ओळख करून दिलीत, तसेच सावरकरांनी वहिनींना अर्पण केलेली कविता वाचून खरंच मन भरून आले. या साध्वीची महती आपण या पुस्तकात गायली, हीच त्यांना आदरांजली!

यात साहित्यिक लेख आहेत, तसेच एकमेव हास्यरंग असलेला लेख आहे. मात्र आपले भावनाशील व्यक्तिमत्व पाहता भावप्रवण लेखन आपल्या अत्यंत जवळचे. मग वडिलांना पैसे देऊन १ तास स्वतः साठी मागणारा मुलगा असो, की सासरी सुखाने नांदणारी पण माहेरची सय येणारी मुलगी असो, या लेखांत आपले लेखन ऐन बहरात होते असे जाणवले.

या पुस्तकातले मला हृदयाच्या निकट असे वाटलेले भाग म्हणजे रंगसोहळा, निसर्गायन आणि समर्थ रामदासांचे निसर्गाचे गायन! विश्वास सर, या भागांत आपले निसर्ग प्रेम काठोकाठ नव्हे तर ओसंडून वाहतंय. आपल्या हृदयस्थ असलेल्या पाटणादेवीच्या मंदिराचे दर्शन असो की, केरळातील हत्तीणीचा अंतिम चित्कार असो, कोकीळ आणि कावळ्याचे वैर, ग्रामीण जीवन, पर्जन्य, वन्यप्राणी, अशी कित्येक सुंदर निसर्गचित्रे आपण त्या भागात चित्रित केलीत, त्यामुळे आपल्याकडे या सुंदर रंगांचे किती विशाल भांडार आहे ते बघून स्तिमित व्हायला झाले. पंचमहाभूतांच्या रंगांचे वर्णन अति बहारदार, वसंतापासून ते शिशिरऋतू पर्यंत हा रंगसोहळा म्हणजे शब्द अन अर्थ यांची समाहित अभिनव आवृत्तीच जणू. या रंगसोहळ्यात हर्षित होऊन रंगून जाणे हाच एकमेव पर्याय उरतो वाचकांपुढे! बरे यात नेहमीचे इंद्रधनुषी (ता ना पि हि अ नि जा ) रंग आहेतच पण हिरमुजी अन किरमिजी, गुलाबी अन अबोली, अस्मानी अन राखाडी, बदामी अन पोपटी रंग आहेत. सर्वांवर गारुड करणारा मोरपंखी (पैठणीचा) सुद्धा आहे बरं कां, पण कल्पनेतल्या मेघांचा सुवर्ण रंग तसेच उगवतीचा प्रेमरंग उधळूनच हा रंगसोहळा साजरा करावा असे हे पुस्तक वाचल्यावर वाटते.


विश्वास सर, या पुस्तकातील प्रत्येक प्रकरण माझे आयुष्य समृद्ध करून गेले. हे सर्वांगसुंदर विविधरंगी पुस्तक सर्व प्रकारच्या वाचकांच्या आवडी जपणारे आणि सर्व वयोगटाच्या वाचकांसाठी आहे, हे मी आवर्जून नमूद करीन. कारण आपण ज्या रंगाचा विचार कराल तो रंग या पुस्तकात असेलच याचा मला संपूर्ण विश्वास आहे!

साहित्यप्रेमी रसिकांनो, विश्वकर्मा पब्लिकेशन्सनी प्रकाशित केलेली सरांची साहित्यत्रिवेणी (अष्टदीप,आनंदाच्या गाव जावे आणि रंगसोहळा) ही पुस्तके विकत घेऊन वाचा आणि इतरांना देखील वाचायला प्रवृत्त करा, म्हणजे हा आनंदाचा रंगसोहळा शतदीपात उजळून निघेल. या निमित्याने मी माझ्या अल्पमतीने या पुस्तकांचे वाचन आणि विवेचन केले याचा आनंद अवर्णनीय आहे. जाता जाता दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वती या त्रिशक्तींना आदर, प्रेम अन भावभक्ती सकट अष्टांगाने नमस्कार करून हेच मागणे की, विश्वास सरांनी असाच नवनवीन साहित्यनिधी वाचकांना उपलब्ध करून द्यावा तसेच आपल्या सर्वांवर देवी वागीश्वरीची अखंड कृपावृष्टी बरसावी!

# !! बीडची खंडेश्वरी देवी !!

आधुनिक केसरी

औरंगाबाद पासून 130 किलोमीटर अंतरावर असणाऱ्या बीड जिल्ह्याचे हे सुंदर खंडेश्वरी देवीचं मंदिर आहे. बीड शहराच्या पूर्वेस अनेक डोंगरांच्या रांगा आपणास पाहावयास मिळतात. विलोभनीय निसर्गरम्य परिसरात डोंगराच्या माथ्यावर खंडेश्वरी देवीचे पुरातन मंदिर आहे. पावसाळ्यात तर डोंगर माथ्यावरून खळखळणारे शुभ्र निर्झर.. हिरवीगार वनश्री.. अशा नयना रम्य वातावरणात खंडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी डोंगर चढत चढताना थकलेली पावले सारे काही विसरून जातात. खंडेश्वरी मंदिराच्या बांधकामात चुना आणि वीटांचा वापर करण्यात आलेला आहे. डोंगर माथ्यावरील भव्य दगडी मंदिर पाहूनच मन भारावून जाते. मंदिराच्या पायऱ्यावरून प्रवेश केल्यावर भव्यसभा मंडप आहे. दगडी खांब रेखीवपणे कोरलेले आहेत. सभा मंडपातून गाभाऱ्यात आल्यानंतर खंडेश्वरी देवीची प्रसन्न भावपूर्ण असणारी शेंदूर वर्णीय मूर्ती पाहून भक्तांचे मन सुखावून जाते .खंडेश्वरी देवीच्या मंदिराच्या बाजूस जवळजवळ दहा मजल्याच्या उंची इतक्या प्रचंड अशा दोन दीपमाळा आहेत. या दिपमाळा इतक्या मोठ्या आहेत की पाहणारे भक्त थक्क होऊन जातात. या दोन्ही दिपमाळांचे बांधकामही जुन्यात आणि वीटांचा वापर करून करण्यात आलेले आहे. दिपमाळावर पायऱ्या केलेल्या आहेत . त्यावरुन शिखरापर्यंत जाण्याची सोय करण्यात आलेली आहे. खंडेश्वरी देवीच्या समोरील डोंगरावर खंडोबाचे सुरेख मंदिर आहे. चंपाषष्ठीला नवरात्राच्या वेळी हजारो भक्तगण या डोंगर माथ्यावर खंडेरायाच्या दर्शन घेण्यासाठी येत असतात. चंपाषष्ठी दसरा दिवाळी नवरात्र यावेळी या प्रचंड दिपमाळावर दिव्यांची रोषणाई करण्याची परंपरा आजही कायम आहे. खंडेश्वरी मंदिराततील नवरात्र उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. चंपाषष्ठीच्या वेळी खूप मोठी यात्रा याठिकाणी भर भरण्याची परंपरा आजही आहे .असंख्य भक्तगण कुलदेवतेच्या दर्शन घेण्यासाठी भक्तीभावानी येत असतात. बीड, आंबेजोगाई, परळी, लातूर, सोलापूर. अशा दुरवरून येत असतात. परळी येथून तेलगाव मार्गे 90 किलोमीटर अंतरावर हे मंदिर आहे. तर नगरपासून 144 किलोमीटर अंतरावर हे मंदिर आहे. बीड येथील सार्वजनिक बांधकाम खात्याची विश्रामगृहे या ठिकाणी उपलब्ध असतात. शिवाय बीडमध्ये छोटी मोठी हॉटेल्स देखील निवासासाठी उत्तम सोय करताना आपणास दिसतात.




सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312

मंदिरातील पुजाऱ्या बरोबर चर्चा झाल्यानंतर बीड वरून देवीच्या दर्शनासाठी आलेल्या भक्तांची दोन परिवाराची भेट झाली वासुदेवराव निलंगेकर , शैलजा निलंगेकर आणि निवृत्त मुख्याध्यापक डी. एस. कुलकर्णी या दोन्ही परिवाराने मंदिराविषयी तसेच बीड मधील इतर मंदिरांच्या विषयी माहिती सांगितली. वासुदेवराव निलंगेकर म्हणाले की मराठवाड्यात पहिला चित्रपट झालेला चित्रपट "निखारे" देवीच्या दीपमाळांच्या परिसरातही चित्रित केलेला होता. बीड शहरात महानुभव पंथांचे श्रीकृष्णाचे सुरेख मंदिर आहे. श्रीकृष्णाच्या जन्माष्टमीस भक्तगण दुरून दुरून येत असतात असेही त्यांनी सांगितले. डी. एस. कुलकर्णीसर म्हणाले की कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे ठाणे हे जवळच असणाऱ्या शिदोडगावी पहावयास मिळते. त्याच बरोबर बीड शहरात मन्सूर शहा यांचा दर्गा , शेहेनशहा वली यांचा दर्गा प्रसिद्ध आहे. विशेषता मुस्लिम समाजातील हजारो बांधव येथे दर्शनासाठी येत असतात. सोलापूर रस्त्यावर सुरेख वास्तुकलेचा नमुना असणारी खजाना विहीर देखील आपणास पहावयास मिळते. तसेच महाराष्ट्रातील 21 गणेश स्थानांच्या मंदिरांपैकी नामलगाव, लिंबागणेश, नवगण राजुरी, राक्षसभुवन, गंगामसला अशी ही मंदिरे बीड जिल्ह्यात आहेत. अनेक मंदिराचे शहर म्हणून बीडचा उल्लेख केला गेला तर तो खऱ्या अर्थाने उचित ठरेल ... हे बाकी खरं..



# नवशक्तीचे नऊ रंग

## तिसरा दिवस : रंग शाही निळा



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

शरद ऋतू म्हणजे सर्व ऋतूपैकी एक आगळा-वेगळा ऋतू ! हा ऋतू सृष्टीत अनेक फेरबदल करून जातो. परतीचा पाऊस जायला लागतो आणि हळूच मागच्या दाराने सृष्टीमध्ये मस्त थंडीचा प्रवेश होतो! वृक्षवेली जुन्या पानांना निरोप देऊन नव्या नवलाई-पालवीला भेटण्यासाठी आतुर होतात! शारदीय काळात निसर्गात होणारा हा मनमोहक बदल संत तुलसीदासजी आपल्या श्री रामचरितमानस या ग्रंथात

बरषा बिगत सरद ऋतु आई। लछिमन देखहु परम सुहाई॥
फूलें कास सकल महि छाई। जनु बरषाँ कृत प्रगट बुढ़ाई॥

हा अलंकारांनी ओतप्रोत भरलेला दोहा लिहितांना, "शरद ऋतूच्या माध्यमातून जणू प्रत्यक्ष वर्षाच धर्तीवर अवतरली आहे!" याचा समारोप करतांना तुलसीदासजी "लो आ गई यह नव वधू-सी शोभती, शरद नायिका" लिहून शरद ऋतूतील सृष्टी म्हणजे अगदी नववधू सारखी सर्वांगसुंदर नायिके सारखी नटून थटून बागडते आहे !

अशा सर्वांगसुंदर शरद ऋतूमध्ये हा नवरात्रोत्सव मोठ्या हर्षोल्हासात साजरा केला जातो म्हणूनच त्याला शारदीय नवरात्रोत्सव म्हणतात! सृष्टीच्या सौंदर्याचा अलौकिक अविष्कार म्हणजे हा उत्सव! जगन्माता असलेल्या स्त्री शक्तीच्या सन्मानाचा हा आनंद-सोहळा! नवविचारांची रुजवणूक करणारा उत्सव! स्त्री स्वातंत्र्याचा आणि मुक्त संचार करण्याचा सर्वोच्च सोहळा म्हणजे हा नवरात्रोत्सव!

नवरात्रोत्सवात श्री देवी म्हणजे मातृशक्ती विविध नामे आणि विविधरंगी वस्त्र धारण करून येत असते असे लोक संकेत आहेत! नऊ रंगात नव दिवस आलेल्या या मातृशक्ती म्हणजे नऊ दिवस होणारी नऊ रंगांची इंद्रधनुषी उधळण संपूर्ण सृष्टीला ललामभूत करून टाकते! आज श्री देवीचन्द्रघण्टामाता नावाने, शाही निळ्या रंगांचे वस्त्र परिधान करून आली आहे! आज तृतीय दिनी

पिण्डजप्रवरारूढ़ा चण्डकोपास्त्रकैर्युता॥
प्रसादं तनुते मह्यं चन्द्रघण्टेति विश्रुता॥

मंत्राने चन्द्रघण्टामातेचे स्तवन केले जाते. चन्द्रघण्टाम्हणजे कपाळी घंटा आकाराची चंद्रकोर असणारी देवीमाता! भाळावरील घंट्याच्या आकाराच्या चंद्रकोरीद्वारे माता संपूर्ण विश्वाला शांती आणि शितलतेचे दर्शन घडवते आहे, आशीर्वाद देते आहे! योग-प्राणायामाच्या दृष्टीने मणिपूर चक्र हे चन्द्रघण्टामातेचे अधिष्ठान असून, मणिपूर चक्रावर मन एकाग्र करूनचन्द्रघण्टामातेची साधना केल्यास शरीरांत अलौकिक शक्तींचा संचार होतो! साधकाची अवस्था आत्मानंदी होते! आजचन्द्रघण्टामातेने शाही निळ्या रंगांचे वस्त्र परिधान केले आहे. निळा रंग म्हणजे निळे-विस्तीर्ण आकाश आणि विशालकाय समुद्र! शाही निळा म्हणजे अधिकार, विश्वास, जबाबदारी, शौर्य, समर्पण, आत्मविश्वास, सहृदयता आणि स्वावलंबन! अथांग पसरलेला, एक तृतीयांश पृथ्वी व्यापून टाकलेला निळा समुद्र आणि सर्वच सृष्टीचं विशाल छत म्हणजेच निळे-निरभ्र आकाश! लेकराच्या डोक्यावर मायेचं पांघरून घालणारी माता आणि तिच्या उदरात संपूर्ण विश्वाचा निर्माता निर्माण करण्याची क्षमता असून याच ताकदीवर तीने संपूर्ण विश्व व्यापून टाकले आहे!

बऱ्याच माता-भगिनी आपल्या भाळी सौभाग्याचं लेणं चंद्रकोर धारण करतात. विविध कार्यक्रमांत पुरुषसुद्धा चंद्रकोर आकाराचा गंध कपाळी लावतात. महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज सुद्धा कपाळी चंद्रकोर आकाराचा गंध लावतात. चंद्रकोर भाळी लावणे म्हणजेच शरीरात शांती, संयम, शीतलतेचा संचार असणे! त्याचबरोबर बऱ्याच माता-भगिनींचा शाही निळा हा आवडता रंग आहे! तेंव्हा ह्या रंगाचे वस्त्र परिधान करणे म्हणजे स्वावलंबन, अधिकार, विश्वास, जबाबदारी, शौर्य, समर्पण, आत्मविश्वास, सहृदयता इत्यादी गुणांचा अंगीकार करणे होय! तेंव्हा चला, इथल्या स्त्री शक्तीला सक्षम करण्याची शपथ घेऊ, तद्वतच स्त्री शक्तीने भाळी चंद्रकोरीने चंद्र-शितलता धारण करून प्रेमाचे सिंचन करून सृष्टीचे पोषण करावे! जयचन्द्रघण्टामाता!

# तांत्रिकी : अंधारातील एक विश्व



नितीन सावंत
संपर्क क्र. 9970744142

आधुनिक केसरी

**तंत्र आधी की ज्ञान आधी ? म्हणजे टेक्निक आधी की नॉलेज आधी? या प्रश्नाचे उत्तर तंत्र आधी असे आहे. आधी टेक्निक मग नॉलेज. म्हणून तंत्रज्ञान हाच शब्द योग्य आहे. तंत्राचेच पुढे ज्ञानात रुपांतरण होते. म्हणजे अगदी सोपे सांगायचे झाले तर आदिमानवाने अन्न मिळविण्यासाठी आधी तंत्र (technique) निर्माण केले आणि मग त्याने ते तंत्र इतरांना सांगत पिढीदरपिढी तंत्र विकसित केले पुढे त्याचे ज्ञानात रूपांतरन केले. तंत्र शब्दाचा अर्थ शेती असा होतो. म्हणजे आधी शेतीचे तंत्र अवगत झाले. आणि पुढे त्याचे ज्ञानात रूपांतरण झाले. वेदांना ज्ञान म्हटले जाते. हे ज्ञान संकलीत आहे. आणि हे ज्ञान (विशेष) 'तांत्रिकी'तुन उसने घेतलेले आहे.**

आज आपल्याला माहिती आहे ती फक्त वैदिकी श्रृती. मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादी सिद्धांतानुसार जर एक वैदीकी श्रृती आस्तित्वात आहे तर तिचे विरोधी द्वंद्व बाळगणारी दुसरी श्रृती कुठेय ? आणि ती कोणती ?

या संदर्भात प्राच्यविद्यापंडीत कॉम्रेड शरद पाटील म्हणतात "आद्य धर्मसुत्रकारांपैकी एक हरीत हा, आगोदर दाखवल्याप्रमाणे मातृवंशक होता. त्याच्या वैरी ब्राम्हण धर्मशास्त्र्यांनी त्याला पुढीलप्रमाणे उध्द्रत केले आहे ' श्रृतिशच् द्विविधा, वैदिकीच तांत्रिकीच् ' . म्हणजेच श्रृती एक नाहीतर दोन आहेत. एक वैदिकी व दुसरी तांत्रिकी. तांत्रिकी म्हणजे स्त्रीसत्तावादी, स्त्रीयांचा वारसा माननारी.चातुर्वर्ण्य पितृसत्ताक वैदिकीने हिंसक विजय मिळवल्यानंतर तांत्रिकीला बदनाम व विकृत केले गेले. स्त्रीसत्ता व तांत्रिकी श्रृती नेणीवेत फेकल्या गेल्या आणि वैदिकी श्रृतीच इतिहासाची जाणीव बनली.

या तांत्रिकी श्रृतीचा जन्म वैराज स्त्रीराज्यातून झाला. आणि या वैराज स्त्रीराज्याची राष्ट्री होती निर्ऋती. ही निर्ऋती हाती धान्य घेवून केस मोकळे सोडुन चौपटावर नाचत धान्यपेरणी करत असे. पुढे पुरुषसत्ताक व्यवस्था आल्यावर मांत्रीकाने मात्र आपला वेष स्त्रीवादीच ठेवला. तांत्रिकी श्रृती तंत्रावर म्हनजे प्रयोगांवर आधारलेली होती. पुढे वैदिकांनी निऋतीला क्रूरे घोरे असे संबोधुन करून व्यक्तीगत दुष्ट नेनीवेत ढकलले.

हा तांत्रिकीचा अख्खा तंत्रयाणी लोकप्रवाह पुढे वैदिकांनी सामुहिक दुष्ट नेणीवेत ढकलला. या बाबतीत पंच 'म' कारच्या संदर्भात लोकांमध्ये ब्राम्हणी प्रचार करुन तंत्रयाणी बदनाम केले गेले. परंतू पंच म कार हे ब्राम्हणी आहेत. ग्रहस्ती शाक्त , शैव , तंत्रयाणी कशाला पंच म कार करत असतील.

या तांत्रिकी श्रृतीचे आनेक पुरावे आजही उपलब्ध आहेत. नवरात्रोत्सव हा निर्ऋतीपुत्री दुर्गेचा उत्सव आहे. तो शाक्त परंपरेतील अत्यंत महत्वाचा सण मानला जातो. त्या परंपरेचे काही अवशेष खेड्यात बघायला मिळतात. खेड्यात जी घटस्थापना केली जाते तो सण हा प्रयोगावर आधारलेला कृषीसण आहे. म्हणजे कमी पाण्यावर, कमी उजेडात कोणते पिक यावर्षी चांगले येइल. हे या प्रयोगाद्वारे तपासले जाते. म्हणजे यावर्षी कोणत्या पिकासाठी वातावरण अनुकूल आहे हे घटस्थापना करुन नऊ दिवस तपासले जाते. या तांत्रीक प्रयोगात आंधार्या खोलीत कडधान्ये मिसळलेल्या मातीवर पाण्याने भरलेले गाडगे ठेवले जाते. गाडग्यातून पाणी पाझरुन नऊ दिवस त्या कडधान्याची रुजने, कोंब निघने, किंवा थोडी वाढही होते. शेवटच्या दिवशी जे धान्य उंच वाढले ते उपटुन काहीगावांत फेट्यात, टोप्यांत खोवून गावभर मिरवले जाते. म्हणजे दहावा दिवस अर्थात दसऱ्याला गावची पंच मंडळी ठरवते की यावर्षी सर्वाधिक फेट्यात कोणते धान्य जास्त दिसले, ते धान्य सर्वांनी पेरायचे किंवा इतर काही धान्यांसाठी सुद्धा यावर्षी चांगले वातावरण आहे हा प्रयोगांती निष्कर्ष लावला जातो.

अशा पध्द्तीने जीवनवादी गरजांना महत्व देनारा तांत्रिकी श्रृतीचा मोठा भौतिकवादी प्रवाह या देशात अस्तित्वात होता.या तांत्रिकी श्रृतीला जरी नेणीवेत ढकलेले असले तरी तिने प्रसवलेले सर्वच्या सर्व लोककलावंत आजही भौतीकवादी म्हणजे इहलोकीचेच भले करुन घेनारी गीते प्रार्थना,भारुडे, कवणें,अभंग,दोहे, गातात. पारलौकिक,आध्यात्मिक अर्थात मृत्यूनंतरच्या जीवनावर तंत्रयानी प्रवाहात फारसे काही सापडणार नाही.शेती चांगली पिकू दे,खरुज जावू दे,मुल होऊ दे,यंदा पाऊस पडु दे,अशा हिशोबाचे त्यांचे गिते कवने असतात.आदिवासी समुदायात अशा प्रार्थाना आजही गायल्या जातात.मोक्ष मिळू दे,स्वर्ग मिळु दे हे लालची लोकांचे वैदिकीचे तत्वज्ञान.भाकरीच्या तंत्रयाणी तत्वज्ञानात त्याला जागा नाही. म्हणजे काय तर तांत्रिकी श्रृती ही भौतिकवादी तत्वज्ञानाचा भारतीय नामनिधानातला भाग.आणि वैदिकी श्रृती ही आध्यात्मवादी तत्वज्ञान.तंत्र करुन आपले जीवन सुखकर बनवनारे प्रयोगशील म्हणजे तंत्रयाणी.अर्थात शाक्त.

हा तंत्रिकीचा प्रवाह सिंधू नदीच्या खोऱ्यातील निर्ऋतिच्या भातशेतापासून सुरु होतो. तिथे तिने अन्यधान्याचे समान वाटप करुन समता,स्वातंत्र्य आणि मित्रता जन्माला घातली. हा प्रवाह पुढे मराठवाड्यातील तेरणा-मांजरेच्या किनाऱ्यावर तुळजाईपर्यंत चालत होता. येथेही ही जुळजा आपल्या प्रजेला 'परडीने' धान्याचे समसमान वाटप करत असे. पुढे तिने आपल्या गणभुमीचीही आपल्या चार ज्ञांतीमधे (लेकींमधे) समान वाटणी केली .तुळजा म्हणजेच तुला अर्थात तुळा करनारी समान वाटप करणारी होय. महाराष्ट्रातीच ९६ कुळांची ती कुळस्वामिनी आहे. नंतर कुळांचे कुळामध्ये भ्रष्टीकरण झाले.ह्या शेतीची समान वाटणी ती चौपटावर करत असे.

म्हणजेच तांत्रिकीचा हा भौतिकवादी प्रवाह भारतभर कार्यरत होता.मध्य आशियातील बलुचिस्तान प्रदेशातील मकराण या ठिकाणावरल्या हिंगलाज मातेपासुन ते नेपाळ पर्यंत आणि जम्मुकाश्मीर पासुन ते कन्याकुमारी पर्यंत हा भारतीय परिप्रेक्षातला तांत्रिकीचा प्रवाह कार्यरत होता.आनेक मंदिरांच्या समोर आसनारे कल्लोळ,बारवा,कुंड हे स्त्रीसत्तेची प्रतिके आणि पुरावे आहेत ज्यामध्ये पुरुषांना आंघोळ घालून गणसभासद बनवले जाई. याला अभिक्तसिंचन विधी म्हनत.पुढे या तिर्थकुंडांना पुण्य कमावण्याच्या सुष्ट नेनीवेत ढकलून मिथकबंद करण्याचे काम ब्राम्हणी व्यवस्थेने केले.

या भौतिकवादी तांत्रिकी तत्वज्ञानाचा सर्वात भरभराटीचा काळ हा ६४ योगीनींचा काळ होता.ज्या काळात चौसष्ट योगीनी आपले स्वतंत्र तत्वज्ञान स्थापून भारतीय संस्कृतीला सुबत्तेच्या,सुपीकतेच्या आधिक उंचीवर नेत होत्या. मानवी मनाचे द्वैती तत्वज्ञान त्यांनीच मांडले.पुढे अनेक बौध्द पंडित आणि आनेक आचार्यांनी या चौसष्ट योगीनींशी चर्चा करुन बौद्धतत्वज्ञान कालपरत्वे अपडेट केले.सौदामिनीशी चर्चा करुन बौद्धमहापंडीत आचार्य दिग्नाग यांनी जानीव नेनीवेचा अभ्यास करुन स्वलक्षणवादाचा सिद्धांत



मांडला.त्याआधी त्यांचे गुरु चौथ्या शतकातील वसुबंधुनी त्याच्या अभिधम्मकोषात मेंदुची द्वैती रचना चित्त संप्रयुक्त (जाणीव ) व चित्त विप्रयुक्त (नेणीव) या संज्ञेखाली मांडली होती.या तांत्रिकी श्रृतीचे मध्ययुगीन भारतातील सर्वात मोठे शक्तीपीठ हे श्रीशैलमला येथे होते.तिथे छत्रपती शिवाजी महाराज सुद्धा जावून आलेले आहेत.

पुढे या तांत्रिकीच्या प्रवाहातच शाक्त आणि शैव हे दोन प्रवाह बनले.गणमातांचे उपासक ते शाक्त आणि शिवाचे उपासक ते शैव बनले. शेतीच्या सुफलीकरणासाठी केले गेलेले विधी म्हणजे यातूविधी. हे विधी स्त्रीयांनी करायचे असतात.कारण प्राथमिक पातळीवरील शेतीचा शोध स्त्रीयांनी लावला.तंत्र या शब्दाचा अर्थ शेती हा होतो हे कॉ शरद पाटील यांनी सिद्ध केलेले आहे. तंत्रसाधना ह्या स्त्रीप्रधान आहेत.म्हणून त्यांना वामाचारी म्हटले आहे.या साधनेने शक्ती या शब्दाला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. शक्तीला माननारा तो शाक्त सांप्रदाय तंत्रमार्गाची देणगी आहे. या शाक्त परंपरेत योनीपुजा होइ.योनीपुजेच्या मुर्ती केवळ भारतातच नव्हे तर जगभरात सापडलेल्या आहेत. महाराष्ट्रातील याचे उदाहरण म्हणजे लज्जागौरी.ही लज्जागौरी नांदेड जिल्ह्यातील कंदाहार तालुक्यातील भाई केशवराव धोंडगे यांच्या गावी बहाद्दरपुऱ्यातही पहायला मिळेल.कामाख्या देवीचेही यात उदाहरण घेता येइल.स्त्रीयोनी ही सुपिकतेचे प्रतिक मानले जायचे. ही तुलना पृथ्वी आणि आकाशाशी केली जाई.म्हणजे ज्याप्रमाणे आकाशातून जमीनीवर पाऊस पडतो त्यामुळे पिके येतात. जमीनीवर आकाशाचे विर्य पडते.आणि सुपीक जमीनीतुन पिके येतात सुबत्ता येते. अगदी त्याच प्रमाणे स्त्रीयोनी ही सुपीक मानली जाई.

पुढे जेव्हा मानवाला पाहिल्यांदा हे कळले की स्त्रीला संतती व्हायला आपन पुरुष कारणीभुत असतो. आपल्यामुळेच हिला अपत्य होते,तेव्हा पुरुषप्रधानता यायला सुरुवात झाली.आणि यातूनच लिंगपुजा सुरु झाली. वायुपुराणात अशीच शिवाच्या लिंगाची कथा येते.शिवाच्या लिंगाचा शोध घेण्यासाठी त्याचे टोक गाठण्यासाठी ब्रम्हा आकाशाच्या दिशेने जातो आणि विष्णु पाताळाच्या दिशेने जातो. शेवटी दोघेही थकून परत येतात पन शिवलिंगाचा अंत लागत नाही.म्हणून आज मंदिरात जी शिवपिंडी दिसते तिचा खालचा भाग हा स्त्रीयोनीचे प्रतिक आहे तर वरचा भाग हा पुरुष योनीचे प्रतिक आहे. हा शैव शाक्तांच्या एकत्रीकरणाचा युतीचा काळ म्हटला पहिजे.असेच आनेक शिल्पामध्ये आपल्याला शिवाच्या मांडीवर पार्वती बसलेली दिसते. अशी शिल्पे आंबेजोगाई येथे सुद्धा आहेत. म्हणजे हे शाक्त शैव पुढे एकत्र येवून वैष्णवांच्या विरोधात लढले.

थोडक्यात काय तर ह्या तांत्रिकीच्या प्रवाहातील शैव शाक्त हे दोन प्रवाह सुद्धा भौतिकवादी गोष्टींनाच महत्व देत होते.या प्रवाहात सुरुवातील कुठलेही आध्यात्म आणि आध्यात्मिकता नव्हती. हा तंत्रमार्ग किती महत्वाचा होता हे डॉ आशोक राणा यांच्या खालील विधानांवरुन लक्षात येइल. ते म्हंतात तंत्रमार्गाने स्त्रीयांना धर्मकार्यात महत्वाचे स्थान दिले,असच वर्णव्यवस्थेत खालच स्थान मिळेल्या शुद्र तसेच अतिशुद्रांनाही दिलं म्हणून सामाजिक समतेचा संदेश देनारा हा भारतातील प्राचीन सांप्रदाय आहे असं म्हणावं लागतं

अशा पद्धतीने हा तंत्रयाणी प्रवाह छत्रपती शिवराय छत्रपती संभाजी महाराजांच्या काळापर्यंत कार्यरत होता. अगदी तुकोबाराय यांची शिष्या बहिणाबाई पाठक शिऊरकर ह्या शाक्त असल्यामुळे संस्कृत शिकु शकल्या. आज मात्र हा तंत्रयाणी तांत्रिकी श्रृतीचा लोकप्रवाह समुहगत दुष्ट नेनीवेत फेकलेला दिसून येतो.

या प्रवाहाचे आज अवशेष उरले आहेत ते लोककलांच्यामधे आणि बोलीमधे.गोंधळी,भारुडकार,सोंगाडे,शाहिर कीर्तनकार, वासुदेव,पिंगळा,यांनी आपल्या कलेतुन तांत्रिकीचा इतिहास पिढीदरपीढीगत जपला आहे.लोककलावंत त्यांचे पोशाख आणि त्यांनी जपलेल्या मौल्यवान कलांचा ठेवा आपण अभ्यासला पाहिजे.त्या कलांचे जतन संवर्धन झाले पाहिजे. भारतीय वैदिकांच्या वैदिकी श्रृतीला चारी मुंड्या चित करुन जातवर्गस्त्रीदास्यांताचे तत्वज्ञान ही तांत्रिकी श्रृती देते. तिचे हे समतावादी तत्वज्ञानच भारतात समता बंधुता आणि मित्रता आनेल.

# पेडगावचे ग्रामदैवत : रेणुकामाता

आधुनिक केसरी

**या गावात प्रवेश करताना दक्षिणेस प्रथमदर्शनी श्री रेणुका मातेचे मंदिर आहे. आतील गाभाऱ्यात रेणुका मातेचा भव्य तांदळा आहे. या गाभाऱ्याचे वैशिष्टय असे की, हा गाभारा उन्हाळ्यात थंड तर हिवाळ्याच्या कडक थंडीतही उबदार वाटतो. देवीचे हे स्थान ग्रामदेवतेच्या रूपाने एक श्रद्धास्थान आहे. या देवीच्या मंदिरा समोर एक उंच मिनार आहे. यास दीपमाळ असे म्हणतात. या दिपमाळेची उंची २६ फूट असून बुडाचा परिघही २६ फूटच आहे. त्या काळातील मजबूत मातीच्या विटांमध्ये याचे बांधकाम केलेले आहे. त्यावर अनेक ठिकाणी सुंदर नक्षीकाम केलेले आढळते. या दिपमाळेचे खास वैशिष्ट्य म्हणजे आजही वरच्या टोकावरून दीपमाळ हलवली तर ती खाली बुडापर्यंत हलते.**

संतोष देशमुख,
पेडगाव

पेडगाव हे परभणी जिल्ह्यातील परभणी पासून पाथरी रोडवर १५ की. मी.अंतरावरील साधारण १० हजार लोकसंख्येचे गाव आहे. तसेच रेल्वे मार्गावरील परभणीहून औरंगाबादला जातानाचे पाहिले रेल्वे स्टेशन आहे. पेडगाव हे सातशे वर्षापूर्वीपासून एक बाजारपेठेचे ठिकाण आहे. त्यामुळे याचे मूळ नाव पेठगाव असे होते.

महम्मद तुघलक याने देवगिरी काबीज केल्यानंतर त्याचा फौज फाटा या ठिकाणी आला. त्या भीतीने येथील मूळ गावकरी पळून गेले, जे राहिले ते तुघलकी फौजेच्या तलवारीखाली आले. त्यानंतर हे गाव जवळपास तीनशे वर्ष निर्मनुष्य होते. अंदाजे तीनशे वर्षापूर्वी निजामी सरदार अजितशहा या ठिकाणी शिकारी साठी आला होता. त्याला हा परिसर फारच आवडला. निजामी राजवटीसाठी हा परिसर त्याला योग्य वाटल्याने त्याने सोबतच्या चार देशमुखांना देशमुखी सनदा देऊन या ठिकाणी वास्तव्य करून वस्ती विकसित करण्यासाठी सांगितले. असाही उल्लेख आहे की या परिसरात घनदाट जंगल व सर्वत्र भरपूर झाडे असल्याने देशमुखी सनदेत याचा उल्लेख "पेडाचे गाव" असा आहे. नंतर त्याचेच पेडगाव असे नामांतर झाले असावे.

या गावात प्रवेश करताना दक्षिणेस प्रथमदर्शनी श्री रेणुका मातेचे मंदिर आहे. आतील गाभाऱ्यात रेणुका मातेचा भव्य तांदळा आहे. या गाभाऱ्याचे वैशिष्टय असे की, हा गाभारा उन्हाळ्यात थंड तर हिवाळ्याच्या कडक थंडीतही उबदार वाटतो. देवीचे हे स्थान ग्रामदेवतेच्या रूपाने एक श्रद्धास्थान आहे. या देवीच्या मंदिरा समोर एक उंच मिनार आहे. यास दीपमाळ असे म्हणतात. या दिपमाळेची उंची २६ फूट असून बुडाचा परिघही २६ फूटच आहे. त्या काळातील मजबूत मातीच्या विटांमध्ये याचे बांधकाम केलेले आहे. त्यावर



अनेक ठिकाणी सुंदर नक्षीकाम केलेले आढळते. या दिपमाळेचे खास वैशिष्ट्य म्हणजे आजही वरच्या टोकावरून दीपमाळ हलवली तर ती खाली बुडापर्यंत हलते. हा एक प्रकारचा झुलता मनोराच आहे. मागील काही वर्षांपर्यंत ही दीपमाळ हलवली की बाजूच्या बारवेतील पाण्यात बुडबुडे निघत. परंतु आता त्या जुन्या बारवेचे नूतनीकरण झाल्याने बुडबुडे दिसत नाहीत. परंतु दिपमाळ मात्र अजूनही हलतांना दिसते. या हलत्या मिनारचे व पाण्यातील निघणाऱ्या बुडबुड्याचे गूढ शोधण्याचा प्रयत्न त्याकाळी निजाम सरकारने व नंतर ब्रिटिशांनी अनेक वर्ष केला. परंतु त्याचे गूढ काही उकलले नाही. ते अजूनही कायमच आहे. स्थापत्य कलेचा व वास्तू कलेचा हा एक अनोखा नमुना आहे. तसेच या मंदिराच्या बाबतीत अनेक दंतकथाही सांगितल्या जातात. परंतु त्या सर्व काल्पनिक आहेत.

या ठिकाणी प्रतिवर्षी अश्विन शु.प्रतीपदे पासून विजया दशमी पर्यंत मोठा ऊत्सव होतो. नऊ दिवस मंदिरात परड्या भरण्यासाठी स्त्रीयांची मोठ्याप्रमाणात लगबग असते. तर काही भाविक नऊ दिवस पाल ठोकून देवी मंदिर परिसरात मुक्कामी राहतात.

नवरात्रात मंदिर परिसरात श्रीमद भागवत कथा, जागर, गोधळ, कीर्तन व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते. तसेच महिला व बालकांसाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. याकाळात मंदिर परिसराची रंग रंगोटी करून भव्य रोषणाई केली जाते. त्यामुळे नऊ दिवस हा परिसर अगदी उजळून निघतो. नवरात्रीत गावातील बाई-लेकी माहेरी मातेच्या दर्शनाला आवर्जून येतात. तर कामानिमित्त बाहेर वास्तव्यास असणारे गावचे सर्व रहिवाशी नवरात्रीत देवीच्या दर्शनाला पेडगावला आवर्जून येतात. सर्व गावाला या निमित्ताने एका धाग्यात बांधून ठेवणारे हे ठिकाण सर्वांचं श्रद्धास्थान आहे. नऊ दिवस या ठिकाणी भरगच्च कार्यक्रम असल्याने भाविकांमध्ये एक प्रकारचे चैतन्याचे वातावरण असते.

कोरोणा काळातील दोन वर्षाच्या खंडानंतर प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी नवरात्री निमित्त मंगळवार दि. 27 सप्टेंबर 2022 पासून मंगळवार दि. 04 ऑक्टोंबर 2022 दरम्यान रेणुकामाता नवरात्र महोत्सव समितीच्या वतीने अनेक धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात दररोज दुपारी 12 ते 4 या वेळेत यशवाडी संस्थानचे महंत श्री. ह.भ.प.1008 शिवेंद्रचैतन्य महाराज यांच्या मधुर वाणीतून श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. तर दररोज रात्री 9 ते 11 या वेळेत कीर्तन होणार असून त्यामध्ये पहिल्या दिवशी ह.भ.प. उमेश महाराज दशरथे आळंदी यांचे तर नंतर ह.भ.प. जलाल महाराज नाशिक, ह.भ.प. अनिल महाराज पाटील बार्शी, ह.भ.प. बाळासाहेब महाराज रंजाळे श्रीरामपूर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पाटील जळगाव, ह.भ.प. काशिनाथ महाराज माने फुळकळसकर, ह.भ.प. चांगदेव महाराज काकडे कंडारीकर यांचे किर्तन होणार आहेत. शेवटच्या दिवशी ह.भ.प. 1008 महामंडलेश्वर मनिषानंद महाराज पुरी रूढी यांचे काल्याचे किर्तन होणार असून मुंजाभाऊ गायकवाड यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दररोज अनेक अनदात्यांच्या वतीने अन्नदानाचे नियोजन आहे. अशा पद्धतीने अनेक कार्यक्रमांची नऊ दिवस याठिकाणी रेलचेल असणार आहे. तर अश्या या ऐतिहासिक, अध्यात्मिक व शास्त्रीय महत्त्व असलेल्या पेडगावला व येथील रेणुका देवी मंदिराला भेट देण्यासाठी आपण सर्वांनी यावे हे पेडगावकरांच्या वतीने आग्रहाचे निमंत्रण....!

# आवडीनुसार क्षेत्र निवडा व यशस्वी व्हा

## प्राचार्य तानाजी शेटे : विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेचा विद्यार्थी गुणगौरव व समाजरत्न पुरस्कार वितरण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज



**कुकाणा :** स्वतःला ओळखा ,आपल्या आवडीनुसार क्षेत्र निवडा ,परिश्रम घ्या व त्यातच यशस्वी व्हा, असे आवाहन माजी प्राचार्य तानाजी शेटे यांनी केले. विश्वकर्मा वंशीय समाज संघटन शाखा अहमदनगरच्या वतीने रविवार दिनांक 25 सप्टेंबर रोजी कुकाणा येथील सुयोग मंगल कार्यालयात आयोजित गुणवंत विद्यार्थी सन्मान, समाजरत्न पुरस्कार वितरण व नूतन कार्यकरिणी सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.विश्वकर्मा वंशीय समाज संघटनचे माजी प्रदेश अध्यक्ष दिलीप दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास राज्य उपाध्यक्ष अरुण भालेकर , आर्किटेक्ट सल्लागार संजय बोराडे ,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य समन्वयक भगवान राऊत ,वि. वं. स. सं. चे राज्य प्रवक्ते भाऊसाहेब राऊत, पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख रावसाहेब मोरे,विभागीय उपाध्यक्ष राजकुमार राऊत ,जिल्हा अध्यक्ष श्री. बाळासाहेब साळंके ,महिला आघाडीच्या अध्यक्षा मंदाताई सोनवणे ,सरचिटणीस रुपालीताई मुसळे, वैशालीताई गडकर ,मार्गदर्शिका आशाताई लोंढे इत्यादि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन करताना प्राचार्य शेटे म्हणाले की, विश्वकर्मा वंशीय समाजातील मुला मलीनी विविध क्षेत्रात शिक्षण व प्रशिक्षण घेऊन ज्ञान व कौशल्य आत्मसात करावे व आपल्या भावी आयुष्यात यशस्वी होऊन समाजाची सेवा करावी. राज्य उपाध्यक्ष अरुण भालेकर म्हणाले की संघटनेच्या नूतन पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा उपयोग समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी करावा. दिलीप दीक्षित म्हणाले की प्रत्येकाने आपला उद्योग,व्यवसाय, नोकरी सांभाळून सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून समाजाच्या हितासाठी एकत्र येऊन काम करावे. यावेळी भगवान राऊत ,संजय बोराडे यांचीही भाषणे झाली.

समाजातील 5 वी ते स्पर्धा परीक्षेपर्यन्त विविध परिक्षात उत्तुंग यश मिळविणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनीचा व त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला. राजेश भालेकर(संचालक, पुनर्विवाह मंच, जालना), रुखमिनी नागापुरे (एकल महिला मंच, बीड) आदिनाथ जवंजळे, जोतिर्लिंग राऊत, दयानंद आगलावे (उद्योजक) डॉ. रवींद्र रणमले (वैद्यकीय सेवा), नवनाथ सूर्यवंशी (शिक्षक), शरद नांगरे (कृषि) आदींचा समाजरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. वि. वं. स. सं.च्या भाऊसाहेब राऊत (राज्य प्रवक्ता) राउसाहेब मोरे (पश्चिम महाराष्ट्र विभागीय संपर्क प्रमुख) राजकुमार राऊत (पश्चिम महाराष्ट्र विभागीय उपाध्यक्ष), बाळासाहेब साळुके (अहमदनगर जिल्हा अध्यक्ष) आदिनाथ भालेकर (जिल्हा कार्यध्यक्ष), प्रसाद गडकर (सरचिटणीस) सोमनाथ राऊत (सहचिटणीस) संतोष क्षीरसागर (उपाध्यक्ष) बाळासाहेब शेलार (दक्षिण जिल्हा प्रामुख) संतोष शेंडगे (उत्तर जिल्हा प्रमुख) गोकुळ गाडेकर (उपाध्यक्ष), सुभाष तमानके (उपाध्यक्ष) सौ. मंदाताई सोनवणे (महिला आघाडी जिल्हाध्यक्षा), वैशालीताई गडकर (कार्याध्यक्ष) रुपालीताई मुसळे (सरचिटणीस), गणेश सोनवणे (नेवासा तालुकाध्यक्ष)द सुनील यशवंत (कार्याध्यक्ष) ओमाकार लोंढे (सरचिटणीस नेवासा) भानुदास वाघ (शेवगाव तालुका अध्यक्ष) दत्तात्रय काळे (कार्याध्यक्ष )संतोष रणमले (सरचिटणीस शेवगाव) यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

महापुरुषांच्या प्रतिमांना अभिवादन, भगवान विश्वकर्मांच्या प्रतिमेचे पूजन व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून या कार्यक्रमाचे उद्‌घाटन झाले. भाऊसाहेब राऊत यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता राऊत व महेश वाघ यांनी सूत्र संचालन केले. एकनाथ गोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रवीण वाघमारे, श्रीकांत सोनवणे, अशोक गोरे, अनिल बारवेकर, काकासाहेब चव्हाण, किरण मोरे, संतोष शिंदे, संदीप नांगरे, दिलीप वाघ, अरुण चव्हाण, बाळासाहेब खामकर, प्रभाकर राऊत, गणेश वाकचौरे, विठ्ठल जानेकर, अशोक राऊत, राम सरोदे, शिवाजी गोरे, पोपट मोरे, रेशमा पगारे, रमेश राऊत, हरिभाऊ राऊत, ओंकार राऊत, शरद राऊत, शुभांगी मोरे, शीतल मोरे, सोनाली राऊत, वंदना राऊत, रेखा राऊत, शैला मोरे, अर्चना राऊत, सतीश राऊत इत्यादिनी परिश्रम घेतले व योगदान देऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# रस्त्याच्या दुरुस्तीसाठी खेकडी गावकऱ्यांनी दिले काँग्रेसचे प्रकाश तायडे यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** अकोला तालुक्यातील मौजे खेकडी गावातील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुर्दशा झाली असल्यामुळे गेल्या काही दिवसांपूर्वी विद्यार्थी, शेतकरी, वृद्ध नागरिक, महिला, छोटे- मोठे व्यावसायिक, वाहनधारकांना रस्ता नादुरुस्त असल्यामुळे अनेक वेळा अपघातांना सामोरे जावे लागते, गेल्या आठवळ्यात तर विदारक आणि माणुसकीला लाजवणारी घटना गावात घडली तुकाराम बुध नामक शेतकऱ्याने आत्महत्या केली असता त्यांच्यावर करण्यात येणाऱ्या संस्कारासाठी रस्ता नसल्याने अंत्यविधी गावाच्या नजीकच भर पावसात ताडपत्री लावून करावा लागला, त्याचबरोबर गावातून बाहेर पडण्यासाठी गावकऱ्यांना मोठ्या संकटांना तोंड द्यावे लागत आहे सायकल, टू व्हीलर, कार चालक यांना सुद्धा गावातून बाहेर निघण्यासाठी रस्ता नसल्यामुळे विद्यार्थी, वृद्ध, नागरिक, रुग्ण, महिला यांना सुद्धा संकटांना तोंड द्यावे लागत आहेत या करिता अकोला येथील काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी प्रदेश प्रतिनिधी माननीय प्रकाश भाऊ तायडे यांना विनंती वजा निवेदन देण्यात आले या निवेदनावर गावातील उपसरपंच सौ. साधना गोपणरायन, गावकरी, विद्यार्थी, महिला यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

निवेदन देण्यासाठी सिद्धार्थ गोपनारायण, निलेश मोरे, नितीन गोपनारायण या गावकरी मंडळींनी प्रामुख्याने पुढाकार घेतला, देश स्वातंत्र्याचा ७५ वा स्वातंत्र्य दिन साजरा करत असताना देखील देशांमध्ये अशी भयावह व दयनीय परिस्थिती असणे



ही बाब देशाच्या व समाजाचा सर्वांगीण विकासाला शोभणारी नक्कीच नाही असे मत प्रकाशभाऊ तायडे यांनी मांडले त्यांनी गावकऱ्यांना असे आश्वासन दिले की येत्या काही दिवसातच गावातील रस्त्याचे बांधकाम मी स्वतः काळजीपूर्वक लक्ष देऊन करून देतो आणि गावातील इतर समस्या आहे त्यांनी ऐकुन घेतल्यावर त्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन सुद्धा प्रकाश भाऊ तायडे यांनी गावकऱ्यांना यावेळी दिले.

# विवाह जुळवणे व टिकवणे पण त्याहून महत्त्वाचे : डॉ. नरेंद्र वैद्य

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वधू-वर यांचे विवाह जुळणे जसे महत्त्वाचे आहे. तसेच ते टिकणे पण त्याहून महत्त्वाचे आहे. त्यामुळे ''विवाह जुळवणे आणि टिकवणे'' या दोन्ही आघाड्यांवर समाजात काम करण्याची गरज आहे असे मत औरंगाबादमधील जुन्या पिढीतील प्रख्यात डॉ. नरेंद्र वैद्य यांनी व्यक्त केले.

श्री समर्थ ब्राह्मण वधू-वर सूचक केंद्र, औरंगाबादतर्फे आयोजित पहिल्या वधू वर मेळाव्यातील उपस्थित वधू-वरांची माहिती असलेल्या वधू-वर पुस्तिकेचे अनौपचारिक विमोचन डॉ. नरेंद्र वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी श्री समर्थ ब्राह्मण वधू-वर सूचक केंद्राच्या प्रमुख ॲड. प्रज्ञा गिरधारी यांनी डॉ. नरेंद्र वैद्य यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

तसेच केंदाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच भविष्यातील योजनांचा थोडक्यात आढावा घेतला.

वधू-वर केंद्राच्या कामाबद्दल डॉ. वैद्य यांनी समाधान व्यक्त केले. तसेच अनेक उपयुक्त सूचना केल्या. आजकाल तरुण आणि उच्च शिक्षित वर्ग समाजाच्या कामासाठी पुढाकार घेत आहे याबद्दल त्यांनी कौतुक केले. ते म्हणाले की, वधू-वर यांना एक किंवा दोन वेळा विवाह ठरण्याच्या आधी परस्परांशी बोलता येते. परस्परांची ओळख नसताना मते, स्वभाव, सवयी, आजार, कौटुंबिक माहिती यांची कल्पना येणे शक्य नसते.



त्यामुळे ''एम.सी.एम.आय.'' ही दोघांचेही स्वभाव गुण दोष तपासून योग्य निर्णय घेण्यास मदत करणारी चाचणी करून घेतली पाहिजे. तसेच ''मायनर ट्रेट थॅलेसेमिया'' ही चाचणी करून घेतल्यास संभाव्य धोके टाळता येऊ शकतात. त्यामुळे विवाह टिकण्यास मदत होईल.

# कादवाची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात

## कादवा करणार सी.एन.जी. प्रकल्प : विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांची विशेष उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रातील मानांचा असलेला कादवा सहकारी साखर कारखाना एक नावलौकिक असणार साखर कारखाना म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखला जातो. या कारखान्यांची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. साखर उद्योग विविध अडचणीतून मार्गक्रमण करत असताना कादवा ने सातत्याने उत्तर महाराष्ट्रात सर्वाधिक उसाला भाव दिला असून कार्यक्षेत्रात ऊस लागवड व एकरी उत्पादन वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असून उसाची पुरेशी उपलब्धता झाल्यावरच प्रकल्प विस्ताराचा निर्णय घेतला जाईल तसेच सी.एन.जी. प्रकल्प प्रस्तावित असल्याचे प्रतिपादन कादवा चे चेअरमन श्रीराम शेटे यांनी केले.



कादवा कारखान्याची 51 वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन श्रीराम शेटे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमाळीच्या वातावरणात पार पडली त्यावेळी श्रीराम शेटे बोलत होते. प्रारंभी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांचे हस्ते कारखान्याचे संस्थापक रा.स.वाघ यांचे पुतळ्याला पुष्पहार घालण्यात येवून अभिवादन करण्यात आले. कारखान्याचे संचालक, शहाजीदादा सोमवंशी यांनी सभासदांचे स्वागत केले .सचिव राहुल उगले यांनी अहवालामध्ये झालेल्या दोष दुरुस्ती चे वाचन केले. चेअरमन श्रीराम शेटे यांनी प्रास्ताविक करताना कारखान्याची वाटचाल विस्तिरणपणे विषद करत यंदा कारखान्यास नफा मिळत लेखा परीक्षणात 'अ' वर्ग मिळाला असल्याचे सांगत कादवा च्या विकासात सर्वांनी मोलाचे योगदान दिल्याबद्दल आभार मानले. यंदा इथेनॉल प्रकल्प कार्यान्वित होणार असून नव्याने सी.एन.जी. प्रकल्प हाती घेणार असल्याचे सांगितले. तसेच गाळप क्षमता 2500 मेटण वरून 3500 मेटन नेण्याची शासन परवानगी मिळवली असून इथेनॉल प्रकल्पाची क्षमता वाढविण्याचे प्रस्तावित असल्याचे सांगितले मात्र सदर प्रकल्प विस्तार हे पुरेसा ऊस उपलब्ध झाल्यावरच केले जातील असे सांगत सर्वांनी जास्तीत जास्त ऊस लावावा व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत एकरी उत्पादन वाढवावे असे आवाहन केले. वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट च्या संचालक पदी श्रीराम शेटे यांची तर मविप्र च्या संचालक पदी प्रवीण जाधव यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सभासद सचिन बर्डे, नरेंद्र जाधव,माजी चीफ केमिस्ट विजय वाघ, हिरामण बोंबले यांनी कारखान्याचे कारभारावर टीकास्त्र सोडत प्रश्न विचारले.त्याच प्रमाणे ज्येष्ठ नेते सुरेश डोखळे, संपतराव कावळे, संजय पाचोरकर, दिलीप जाधव, जे.डी केदार, जयराम डोखळे, दत्तात्रेय देशमुख आदींनी प्रश्न उपस्थित केले.चेअरमन श्रीराम शेटे यांनी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. विठ्ठलराव संधान, संपतराव कोंड, माजी कर्मचारी विश्राम दुगजे यांनी चर्चेत भाग घेत सूचना मांडल्या.संचालक शहाजी दादा सोमवंशी यांनी आभार प्रदर्शन केले, सूत्रसंचालन अशोक शिंदे यांनी केले व सदर सभेस विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ,माजी आमदार धनराज महाले, मविप्र संचालक प्रवीण जाधव,शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील पाटील, कारखान्याचे व्हाईस चेअरमन शिवाजीराव बस्ते यांचेसह सर्व संचालक कार्यकारी संचालक हेमंत माने आदींसह सभासद अधिकारी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वाधिक ऊस पुरवठा करणारे सभासद सचिन बर्डे, प्रकाश केदार, सौरभ शेटे, अनुपम भालेराव, मधुकर टोपे, कर्मचारी गटातून महेंद्र मोरे तसेच आडसाली प्रकारामध्ये महेंद्र जाधव, संदीप कारभारी मोगल, पूर्व हंगमीमध्ये संकेत सोमवंशी, वैभव पाटील, सुरू प्रकारांमध्ये सागर संधान, विलास वाळके, खोडवा प्रकारांमध्ये निवृत्ती देवरे, लक्ष्मण शिरकांडे, यांचा सन्मान करण्यात आला.

# सय्यद कुटुंबावरील दाखल खोटे गुन्हे माघे घ्या

## सुमित्रा खंडारे : पिशोर पोलिसांचा मनमानी कारभार; भारतीय दलित कोब्रा छेडणार आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील पिशोर येथील सय्यद कुटुंबाच्या घरात घुसुन 20 ते 25 जनांनी मारहाण केल्याची घटना 26 जुलै 2022 रोजी घडली होती. त्यात संबंधित आरोपीने सय्यद यांच्या मुलाला जबर मारहाण करीत पत्नीच्या गळ्यातील सेवनपीस हिसकून नेले होते, तसेच या संदर्भात बातमी अनेक वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्या होत्या,या घटने संदर्भात सय्यद आरेफ़ यांनी त्यांच्यांवर हल्ला करणारे 20 ते 25 जणांचे नाव दिले होते, मात्र पोलिसांनी त्यांच्या मनाने फक्त 8 लोकांवर कार्यवाही केली. उलट तक्रार देणारे सय्यद कुटुंबावर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना आर्थिक मानसिक शारीरिक त्रास दिले, ही बाब भारतीय दलित कोब्रा सामाजिक संघटना यांना माहिती होताच त्यांनी सय्यद आरेफ यांच्या कुटुंबावर झालेल्या अन्याय विषयी पोलिस अधीक्षक औरंगाबाद ग्रामीण यांना निवेदन देण्यात आले आहे,



या निवेदनात म्हणटले आहे की, दिनांक २४ जुलै २०२२ रोजी सय्यद आरेफ सय्यद लाल कुटूंबियांवर जीवघेणा हल्ला करणारे हल्लेखोर यांना तात्काळ अटक करून गुन्हे दाखल व करा व पिडीत सय्यद आरेफ कुटूंबियांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घ्या आणि पिशोर पोलीस ठाणे हददीत चालणारे अवैध धंदे बंद करून पोलीस निरिक्षक श्रीमती शिंदे यांची तात्काळ बदली करण्याची मागणी निवेदना द्वारे करण्यात आली आहे, भारतीय दलित कोब्रा महिला आघाडी औरंगाबाद या सामाजिक संघटनेच्या वतीने निवेदन सादर करण्यात येते की , दिनांक २६/०८/२०२२ रोजी सायंकाळी 7 ते 8 वाजे दरम्यान सय्यद आरेफ सय्यद लाल . राहणार- पिशोर ता, कन्नड जि . औरंगाबाद हे कुटूबियांसोबत जेवण करीत असताना त्याच गावातील २५ ते ३० माथेफिरू यांनी जुन्या भांडणाच्या कारणांवरून सय्यद आरेफ यांच्या घरात घुसून लाढया - काठया , मोठाले दगड घेवून मारून सामुदायिक हल्ला चढविला . या हल्ल्यात सय्यद आरेफसह त्यांची पत्नी , मुलगा व घरातील लहान मुले , महिला पुरुष जबर जखमी झाले आहेत . सय्यद आरेफ यांनी औषधोपचारानंतर पिशोर पोलीस ठाणे , पिशोर ता . कन्नड येथे रितसर तक्रार देवून हल्लेखोरांवर कारवाईची मागणी केली होती . त्याचप्रमाणे या गंभीर घटनेची दखल घेवून भारतीय दलित कोबा या सामाजिक संघटनेच्या वतीने मा . पोलीस अधीक्षक साहेब यांना निवेदन सादर करून सय्यद आरेफ कुटुंबियांना न्याय दयावा , अशी विनंती केली होती . परंतू पिशोर पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक शिंदे यांनी सय्यद आरेफ कुटूंबियांवर हल्ला करणारे २५ ते ३० हल्लेखोरांपैकी फक्त आठ हल्लेखोरांवर कारवाई केली आणि उर्वरित हल्लेखोरांची पाठराखण करून त्यांना अभय दिले . पोलीस निरिक्षक श्रीमती शिंदे यांनी उर्वरित आरोपीसोबत हातमिळवणी करुन उलट पिडीत सय्यद आरेफ कुटूंबियांवरतीच गुन्हे दाखल करून त्यांना मानसिक, शारीरिक व आर्थिक त्रास देवून त्यांची समाजात बदनामी केली आहे.

हल्लेखोरांना पोलीसांचे पाठबळ मिळाल्यामुळे हल्ले खोरापैकी अनेक जन आता सुद्धा मारहाण करुण ठार मारण्याची धमकी देत आहे. सय्यद कुटुंबाचे जीने मुश्किल झाले असल्याचे चित्र दिसत आहे,उर्वरित 10 ते 15 लोकांवर कड़क कार्यवाही करून सय्यद आरेफ़ यांचे रक्षण करावे, त्यांच्या वर सुड़बुद्धीने दाखल केलेले गुन्हे माघे घ्यावेत हल्ला करण्यासाठी घेऊन आलेले वाहन जप्त करावे, तसेच पिशोर पोलीस ठाणे हददीमध्ये पोलीस निरिक्षक श्रीमती शिंदे यांचे आशिर्वादाने चालणारे अवैध दारू धंदे, मटका, जुगार, गांजा तस्करी ,गुटखा तस्करी भुमाफिया, खंडणीखोरीला अभय, तोड़ी पाणी साठी नेमलेले खबरी, अवैध धंदयांची चौकशी करून ते तात्काळ बंद करावेत आणि श्रीमती शिंदे यांची तात्काळ बदली करावी व संघटनेला न्याय दयावा, अन्यथा अन्याय - अत्याचाराच्या विरोधात संघटनेच्या वतीने १५ दिवसानंतर जनओदोलन छेडण्यात येईल, याची गंभीर दखल घ्यावी असे निवेदन नमूद केले आहे. यावेळी यावेळी महिला आघाडी जिल्हा अध्यक्ष सुमित्रताई खंडारे, जिल्हाध्यक्ष बाबासाहेब आस्वार, उपजिल्हाध्यक्ष भालेराव, मीना गायकवाड, सुनिता चव्हाण, मीनाक्षी हिवराले, निशा औचरमल, आशा पवार, प्रयागबाई राठोड, यशोदा चव्हाण, छाया प्रधान, प्रतिभा चाबुकस्वार, कविता आव्हाड, यांच्या सोबत संघटनेचे पदाधिकारी मोठ्यसंखेंने उपस्थित होते.

## फर्दापूर येथे अनोळखी महिलेचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापुर येथील एक अनोळखी महिलेचा अकस्मात मृत्यू फर्दापूर पोलीस ठाणे अकस्मात मृत्यु नोंद क्रमांक 09/2022 मधील अनोळखी मयत महिला ही दिनांक 04/09/2022 पासुन जुन्या आजारावर औषधोपचार कामी जिल्हा रुग्णालय, जळगांव येथे दाखल झाली होती तिचेवर औषधोपचार सुरु असतांना ती 09/09/2022 रोजी मयत झाली आहे. सदर अनोळखी मयत महिला हिचे वारसांचा तसेच नातेवाईकांचा शोध घेऊन देखील त्यांचा शोध लागलेला नसुन सदर अनोळखी मयत महिला हिचे प्रेत अधिक काळ ठेवल्यास सदरचे प्रेत कुजून त्यातून दुर्गंधी येऊन ते आरोग्यास हानिकारक असल्याने सदर मयत अनोळखी मयत महिलेच्या प्रेतावर जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचेकडून अंतिम संस्कार करण्यात आले आहे. तरी सदर मयत अनोळखी महिला हिचेबाबत कोणास काही माहिती असल्यास तात्काळ खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. 1) सपोनि देवीदास वाघमोडे, फर्दापुर पोलीस ठाणे, मो.क्र.8888810042, 2) एन.जी.लोखंडे, पोलीस नाईक फर्दापुर पोलीस ठाणे, मो.क्रं.9370711998 3) वाय.पी.कोळी, पोलीस अंमलदार मो.क्रं. 9653477509



## प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक संघटनेचा वर्धापनदिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रगतीशील जेष्ठ नागरिक संघटना दरवर्षी सप्टेंबर मध्ये वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविधकला क्रीडा स्पर्धांचे आयोजन करत असते. यावर्षी प्रश्नमंजुषा एक , गमतीदार खेळ , सामान्य ज्ञान स्पर्धा स्मरणशक्तीची स्पर्धा पाककला स्पर्धा रांगोळी स्पर्धा अशाच प्रकारच्या स्पर्धा चे आयोजन करण्यात आलेले होते. त्यामध्ये प्रश्नमंजुषा या स्पर्धेमध्ये एन-४ गटातील सौ. सुनीता चंद्रशेखर पाठक आणि सौ मुग्धा कुलकर्णी यांनी प्रथम क्रमांक पटकावलेला आहे. त्याचप्रमाणे सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये सौ. सुनीता पाठक यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

संस्थेचे स्नेहबंधन नावाच्या वार्षिक अंकामध्ये सुनीता चंद्रशेखर पाठक यांनी अर्जुन एकवीर योगी या या विषयावरील लिहिलेल्या लेखाला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सुनिता चंद्रशेखर पाठक यांनी मिळवलेल्या स्पर्धेतील मोठ्या यशासाठी त्यांची सर्वांनीच मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे.

## संघटनेने दिलेल्या जबाबदारीस पूर्णतः न्याय देणार : वाघमारे

### कास्ट्राईब वन विभाग संघटना मराठवाडा अध्यक्षपदी अमोल वाघमारे

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड शहरातील निवासी तथा पिशोर वनविभागाचे वनरक्षक अमोल वाघमारे यांची औरंगाबाद येथे नुकतीच झालेली संघटनेच्या बैठकीत कास्ट्राईब वन विभाग कर्मचारी संघटना मराठवाड़ा अध्यक्ष पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे, ही निवड संस्थापक अध्यक्ष कृष्णा इंगले, कार्यध्यक्ष मनोज कांबळे, यांच्या अध्यक्षता खाली पार पाडन्यात आली आहे, या वेळी अमोल वाघमारे बोलत होते की नागपूर महाराष्ट्र राज्य, डी. एस. थोरात जेष्ठ कायदेविषयक सल्लागार मनोज कांबळे राज्य कार्याध्यक्ष कास्ट्राईब वन विभाग कर्मचारी संघटना नागपूर महाराष्ट्र राज्य, यांचे सह कास्ट्राईब कर्मचारी महासंघातील विविध खात्यातील पदाधिकारी उपस्थितीत कास्ट्राईब वन विभाग कर्मचारी संघटनेतील सर्व पदाधिकाऱ्यांनी सर्व समावेशकरीत्या लोकशाही पद्धतीने बिनविरोध निवड करून कास्ट्राईब वन विभाग कर्मचारी संघटना विभागीय अध्यक्ष (मराठवाडा अध्यक्ष) पदाची अतिशय महत्त्वपूर्ण जबाबदारी माझ्यावर दिलेली आहे व याबाबतची



कर्तव्यपूर्ती तसेच संपूर्ण योगदान देऊन पदास पुर्णतः न्याय देणार हेही तितकच निर्विवाद पणे आपणांसमोर मांडत आहे. या ठिकाणी सर्वांचा नामोल्लेख घेणे शक्य नाही. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. आजवर कोणाचे कळत नकळत माझ्याकडून अंतर्मन दुखावले असल्यास मला मोठ्या मनाने माफ करावे. तसेच मला इथपर्यंत यशस्वी वाटचालीस नेहमीच मार्गदर्शन करणारे सर्व मा. वनाधिकारी, संघटनेचे मा. पदाधिकारी, सदस्य वन बांधव वन भगिनी (कार्यालयीन तसेच क्षेत्रीय) आपणा सर्वांची कायम साथ, सूचना तसेच मार्गदर्शन असू द्यावेत मी आपला आभारी आहे. विभागीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आपण सर्वांनी विविध माध्यमातून शुभेच्छा दिल्या. त्याबद्दल आपले सर्वांचे पुनश्च मनस्वी धन्यवाद असे प्रतिपादन त्यांनी केले.

# जि. प. मराठी शाळा बंद करण्याचा घाट रचला जातोय



कामाजी आनंदराव शिंदे

आधुनिक केसरी

सध्या महाराष्ट्रामध्ये एक वेगळेच वातावरण निर्माण झालेले आहे आज महाराष्ट्रातील मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत याला जबाबदार शासन आहे महाराष्ट्र मध्ये प्रत्येक ग्रामीण क्षेत्रांमध्ये गरिबांसाठी मराठी शाळा महत्वाची असते या मराठी शाळेमध्ये सामान्य कुटुंबातील शेतकरी कष्टकऱ्यांची मुले शिकत असतात आणि त्यांना ते स्वस्तही पडते ते सुद्धा हिसकावून घेण्यासाठी इथे प्रयत्न केला जातोय. इंग्रजी शाळांच्या वाढत्या प्रदूषणामुळे महाराष्ट्राच्या संस्कृतीला कुठेतरी तडा जातोय आज महाराष्ट्र मध्ये हजारो इंग्लिश स्कूल ओपन करण्यासाठी शासनाची मान्यता घेण्यात आली यांना सुद्धा कुठेतरी कळाले पाहिजे.

सामान्यांचे कष्टकऱ्यांचे मुले आहेत हे कुठे शिकतील त्यांच्याकडे एवढा पैसा आहे का शासनाला या मुलांना ना शिकवायचा आहे की गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळवायचा आहे आज शेतकऱ्यांना आपल्या मुलांना शिकवण्यासाठी एवढी परिस्थिती नाही जे श्रीमंत आहेत ते इंग्रजी शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत त्या इंग्रजी शाळा मुळेच महाराष्ट्रातील मराठी शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत म्हणून सर्व महाराष्ट्रातील सुशिक्षित लोकांनी तरुणांनी व कर्मचाऱ्यांनी मराठी शाळांना वाचवलं पाहिजे तरच आपली संस्कृती आपली सभ्यता मुलांमध्ये संस्कार घडवण्याचं काम मराठी शाळा मधूनच होते आज इंग्रजी शाळांमध्ये स्पर्धा परीक्षा व व शालेय अभ्यासक्रम याचा काही संबंध नाही आज मराठी महाराष्ट्राची राजभाषा आहे तिला प्रत्येक ऑफिसमध्ये कंपल्सरी लैंग्वेज म्हणून तिचा उपयोग केला जातो आपली संस्कृती जपून राहावे यासाठी सर्वांनी मराठी शाळा वाचवण्यासाठी प्रयत्न करूया आणि एक मनी संकल्प धरूया जे वाडी वस्ती रस्ता रोड कुठे पण जे इंग्लिश स्कूल आहेत त्यांना कुठलीही मान्यता नसून त्यांच्या मनाने ते शाळेचा बाजार मांडला गेलेला आहे त्यांची वेळेत चौकशी करून त्या शाळा बंद करून मराठी शाळेकडे प्रवृत्त करावे असे मी शासनाकडे विनंती करतो.



# चिमुकल्यांसह स्कूलबसमध्ये प्रवास करत पंकजाताई मुंडे रमल्या शालेय विद्यार्थ्यांत

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**परळी :** भाजपाच्या राष्ट्रीय सचिव माजीमंत्री पंकजाताई मुंडे यांची सर्वस्तरातील लोकप्रियता सर्वज्ञात आहे. चिमुकल्या बालकांपासून ते वयोवृद्धापर्यंत पंकजाताई लोकप्रिय लोकनेत्या नेत्या म्हणून परिचित आहेत. लोकांमध्ये मिसळण्याच्या बाबतीत आणि लोकांना आपलसं करण्याच्या बाबतीत त्या नेहमीच अग्रेसर असतात. विशेष म्हणजे त्यांना स्वतःला अतिशय संवेदनशीलपणे व सकारात्मकतेने लोकांना भेटणे, त्यांच्यात मिसळणे आवडते. विविध कार्यक्रम, प्रसंग व वेगवेगळ्या ठिकाणी याचा नेहमीच अनुभव येतो. असाच एक अनुभव आज परळीमध्ये बघायला मिळाला. पंकजाताई मुंडे या परळी शहरातून जात असताना छत्रपती शिवाजी महाराज चौकात होत्या. त्याच वेळेला समोरून एका शाळेची स्कूल बस जात होती. पंकजाताईंना पाहून या स्कूलबसमधील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी "ताई, ताई "म्हणून आवाज दिला व सर्वांनी ताईंना हात उंचावत अभिवादन केले. या विद्यार्थ्यांचा उत्साहच इतका ओसंडून वाहत होता की, पंकजाताईनाही त्यांच्यात सहभागी होण्याचा मोह आवरता आला नाही. पंकजाताईंनी त्या स्कूलबस मधील प्रत्येक विद्यार्थ्यांशी हस्तांदोलन करत त्यांना प्रोत्साहीत केले. परंतु या स्कूलबस मधील सर्वच विद्यार्थ्यांचा प्रत्येकाला ताईंशी हस्तांदोलन



करण्याचा मनोमन आग्रह दिसून आल्याने या चिमुकल्यांचा हट्ट पुरवत पंकजाताईंनी चक्क स्कूल बस मध्येच प्रवेश केला. सर्व विद्यार्थ्यांसमवेत या स्कूल बस मध्ये बसून काही अंतर त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारत प्रवासही केला. या विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करत प्रत्येकाची चौकशी करत या चिमुकल्यांचा उत्साह वाढवला....!

## ओजस्वीच्या वाढदिवसानिमित्त थेट पंतप्रधानांकडून शुभेच्छा



प्रधान मंत्री
Prime Minister

नई दिल्ली
भाद्रपद 23, शक संवत् 1944
14 सितम्बर, 2022

श्रीमती एवं श्री गोपाल मोहनलाल मंत्री जी,
आपको ओजस्वी के जन्मदिन की बहुत-बहुत बधाई।
सुखद भविष्य और भावी प्रयासों के लिए हार्दिक शुभकामनाएं।
स्नेह और आशीष सहित,

(नरेन्द्र मोदी)

आधुनिक केसरी न्यूज


**गंगाखेड :** शहरातील व्यंकटेशनगर येथे राहणारे तथा सरस्वती विद्यालयातील सहशिक्षक गोपाळमंत्री व त्यांची पत्नी अभिलाषा यांची कन्या कु. ओजस्वी हिचा प्रथम वाढदिवस दिनांक 17 सप्टेंबर रोजी संपन्न झाला. देशाचे सन्माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस सुद्धा 17 सप्टेंबर रोजी होता या अनुषंगाने गोपाळ मंत्री यांनी पंतप्रधान कार्यालयाशी थेट संपर्क साधत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटून प्रत्यक्ष आशीर्वाद देण्याविषयी विनंती केली होती. परंतु सुरक्षिततेच्या कारणास्तव ती नाकारण्यात आली. परंतु एका सामान्य नागरिकाच्या एका साध्या विनंतीची दखल स्वतः देशाचे पंतप्रधान यांनी घेऊन आपला वैयक्तिक शुभेच्छा संदेश स्पीड पोस्ट च्या माध्यमातून मंत्री परिवाराला पाठवला. या पत्राची संपूर्ण शहरात चांगलीच चर्चा ऐकावयास मिळाली. कारण परभणी जिल्ह्यात प्रथमच एखाद्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त थेट देशाच्या पंतप्रधानांकडून शुभेच्छा मिळणे ही निश्चितच सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.



## ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी क्षेत्रातील तंत्रज्ञ, कलाकारांना त्यांच्या सर्वोत्तम कामगिरीसाठी देण्यात येणारा 'दादासाहेब फाळके पुरस्कार'जाहीर करण्यात आला आहे. यंदाचा प्रतिष्ठित दादासाहेब फाळके पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना जाहीर करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी याबाबतची घोषणा केली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना चित्रपट क्षेत्रात आणि अभिनयातील योगदानासाठी हा पुरस्कार देण्यात आला आहे. आपल्या दमदार अभिनयाने ६० ते ७० च्या दशकात बॉलिवूड गाजवणाऱ्या अभिनेत्री म्हणून त्यांना ओळखले जाते. त्या ७९ वर्षांच्या आहेत. ६०-७० च्या दशकात त्या त्यांच्या मानधनामुळेही चर्चेत असायच्या. त्या काळात सर्वाधिक मानधन घेणारी अभिनेत्री अशी त्यांची ओळख होती. 'मेरा गाव मेरा देश', 'कटी पतंग', 'तीसरी मजिल' अशा अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या अभिनेत्री म्हणून आशा पारेख यांना ओळखले जाते. एकेकाळी त्यांनी त्यांच्या सौंदर्याने अनेकांना घायाळ केले होते. त्यांनी अभिनयाच्या जोरावर सिनेसृष्टीत स्वतःची अशी वेगळी ओळख निर्माण केली होती. १९५९ पासून ते १९७३ च्या काळात त्यांनी बॉलिवूडवर जादूच केली होती. त्यावेळी आशा पारेख यांच्या सौंदर्याचे लाखो चाहते होते. आशा पारेख यांचा जन्म २ ऑक्टोबर १९४२ रोजी झाला. १९५९ ते १९७३ या काळात बॉलिवूडमधील सर्वात यशस्वी अभिनेत्री म्हणून तिला ओळखले जाते. आशा पारेख यांना बालपणापासून नृत्याची आवड होती. त्यांची आई सुधा पारेख यांनी आशा यांना नृत्य शिकण्यासाठी शिकवणीही लावली होती.



## औराळा फाटा येथे जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये असलेल्या औराळा फाटा येथे सोमवारी दिनांक. २६ सप्टेंबर रोजी पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली. औराळा फाटा येथे पोउपनि खांडखुळे यांना गुप्त बातमिदारा मार्फत माहिती मिळाली की, ओमंकार पाणी फिल्टर च्या भिंती लगत मोकळ्या जागेवर काहि इसम हे झन्नामुन्ना नावाचा जुगार खेळत आहे त्यावरुन त्यांनी वरील पोलीस स्टाँप सोबत वरील ठिकाणी छापा मारला असता सदर ठिकाण इसम नामे १) चांगदेव नरहरी शिंदे वय-४२ वर्षे रा.विटा २) एकनाथ सुदाम गोरे वय २५ वर्षे रा.चापानेर ३)सुनिल बाबुराव निकम वय-३० वर्षे रा.गव्हाली ४) लहु बळीराम राठोड वय-३१ वर्षे गव्हाली ५) प्रमोद दगडु जाधव वय- २८ वर्षे रा.हसनखेडा हे मिळुन त्यांच्या कडुन रोख रक्कम मोबाईल व जुगार चे साहित्यसह एकुन ४४३००/- सह मिळुन आले त्यांच्यावर पोलीस ठाणे देवगाव रंगारी येथे गुन्हा दाखल केलेले असुन, सदर कार्यवाही पोउपनि खांडळुळे साहेब, सोबत पोलीस नाईक, दिनेश कोळी, अनिल खरात, पोलीस अमंलदार, भावसिंग जारवाल, किरण जाधव, किसन गवळी यांनी यांनी केली.

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या शेवगाव तालुका अध्यक्षपदी सचिन सातपुते



आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या शेवगाव तालुका अध्यक्षपदी पत्रकार सचिन सातपुते यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शिर्डी येथे संपन्न झालेल्या पत्रकार संघाच्या जिल्हा पदाधिकारी व पत्रकारांच्या बैठकीमध्ये प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे यांनी सर्वानुमते निवड केली. निवडीनंतर जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते, अनिल रहाणे यांच्या हस्ते सातपुते यांचा सत्कार करण्यात आला. सातपुते हे २००६ पासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून छायाचित्रकार व पत्रकार म्हणून त्यांनी विशेष लौकीक मिळवला आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून शेवगाव तालुक्यातील पत्रकारांचे केलेले संघटन व त्यामाध्यमातून राबवलेले विविध समाजोपयोगी उपक्रम याची दखल घेवून आरोटे यांनी ही निवड घोषीत केली. यावेळी निवड समितीचे अध्यक्ष सोमनाथ काळे, प्रदेश कार्यकारणी सदस्य नीलकंठ कराड, जिल्हा कार्याध्यक्ष सूर्यकांत नेटके, कैलास बुधवंत, रमेश चौधरी, अनिल कांबळे, जगन्नाथ गोसावी, महादेव दळे, याकुब शेख, अकबर सय्यद, कुंडलिक घुगे, रावसाहेब मरकड, जनार्धन लांडे, अलीम शेख, राजू घुगरे, रविंद्र उगलमुगले, गणेश देशपांडे, राजेंद्र पानकर, उध्दव देशमुख, बाळासाहेब खेडकर, विजयकुमार लड्ढा, रावसाहेब निकाळजे, शाम पुरोहीत, अनिल खैरे, सुरेश बडे, कपील शेख, विजय धनवडे, सोमनाथ लोखंडे आदी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून तालुक्यातील पत्रकारांच्या प्रश्न समजावून संघटन वाढवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सातपुते यांनी सांगितले. या निवडीबद्दल सातपुते यांचा मराठा सेवा संघ, घाडगे अमृततूल्य, अखिल भारतीय सरपंच परीषद, जाणता राजा युवा ग्रुप, महाराष्ट्र अॅग्रो, साम्राज्य युवा ग्रुप, स्वाभिमानी शेतकरी संघटना आदींच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मॅरेथॉन बैठका

### स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ : उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांच्या हस्ते होणार उद्घाटन : कुलगुरू डॉ. उद्धव भोसले

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** विद्यार्थीहित लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण राबविण्याकरिता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात मॅरेथॉन बैठका आणि कार्यशाळा घेण्यात येत आहेत.
विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राचार्यांच्या कार्यशाळेनंतर आता ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात चारही जिल्ह्यातील शिक्षकांसाठी कार्यशाळा घेण्यात येणार आहेत. या कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांनी दिली. गेल्या आठवड्यात विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राचार्यांची बैठक कुलगुरू डॉ. भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या बैठकीत कुलगुरूंनी प्राचार्यांना या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी 'रोडमॅप' तयार करण्याचे निर्देश दिले होते. या बैठकीपाठोपाठ सोमवारी (दि. २६) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक संकुल, लातूर व परभणीचे उप-परिसर आणि हिंगोलीच्या न्यू मॉडेल डिग्री कॉलेजच्या शिक्षकांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीत कुलगुरूंनी नवीन शिक्षण धोरण राबविण्याकरिता करावयाच्या तयारीचा आढावा घेतला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, अधिष्ठाता डॉ. अजय टेंगसे, अधिष्ठाता डॉ. एल. एम. वाघमारे, आय.क्यू.ए.सी. विभागाचे संचालक डॉ. डी. डी. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.
या बैठकीत मार्गदर्शन करताना डॉ. उद्धव भोसले यांनी विद्यापीठातील सर्व अभ्यासक्रम हे बहुआयामी, दर्जेदार व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याच्या दृष्टीने तयार केला पाहिजे, अशी आग्रही भूमिका मांडली. यासाठी अभ्यासक्रमात अमुलाग्र बदल करण्यात यावा, असे करताना विद्यापीठाचे माजी विद्यार्थी, उद्योगक्षेत्रातील मान्यवर, शिक्षण



क्षेत्रातील जाणकार आणि विद्यार्थी यांच्या मतांचा आदर करण्यात यावा, अशा सूचनाही कुलगुरूंनी केल्या आहेत. यापुढे प्रत्येक अभ्यासक्रमाचा उद्देश आणि अपेक्षा काय आहेत? याचा आराखडा तयार करण्याचे निर्देश विद्यापीठ अभ्यास मंडळास दिले. केवळ अभ्यास मंडळाच्या सदस्यांनीच हा आराखडा तयार करायचा नसून त्यामध्ये सर्व शिक्षकांनी सहभाग घ्यायचा आहे आणि व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम निर्माण केला पाहिजे, अशी अपेक्षा देखील कुलगुरूंनी व्यक्त केली.
नवीन शिक्षण धोरण विद्यापीठात प्रभावीपणे राबविण्याकरिता ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात नांदेड, परभणी, लातूर आणि हिंगोली या चारही ठिकाणी शिक्षकांसाठी प्रशिक्षण व कार्यशाळा घेण्यात येणार आहेत. नांदेड येथील यशवंत महाविद्यालय, हिंगोलीच्या आदर्श महाविद्यालयात आणि दयानंद महाविद्यालय, लातूर तर परभणीची कार्यशाळा श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित केली जाणार आहे. या कार्यशाळेत विविध तज्ज्ञ नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाविषयी मार्गदर्शन, माहिती तथा सूचना करणार आहेत. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचे काम या प्रशिक्षित शिक्षकांच्या माध्यमातून होणार आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार असून उच्च शिक्षण सचिव प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. आयक्यूएसी विभागाने शिक्षकांसाठी तयार केलेल्या ऑनलाइन पोर्टलचे उद्घाटन कुलगुरू डॉ. भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलतांना डॉ. डी. डी. पवार यांनी पुढील नॅकसाठी आवश्यक असलेल्या बाबींची सविस्तर मांडणी करतांना शिक्षकांकडून आवश्यक त्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. डॉ. बी. सुरेंद्रकुमार रेड्डी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून शेवटी उपस्थितांचे आभार मानले. प्र कुलगुरू डॉ जे एम बिसेन, अधिष्ठाता डॉ अजय टेंगसे, डॉ एल एम वाघमारे यांची या वेळी उपस्थिती होती.

# शिक्षकी पेशाला आयुष्य समर्पित केलेल्या शिवहार ढगेंचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथील स्वा.रा.ती. रुग्णालय मेडिकल परिसरातील योगेश्वरी प्राथमिक शाळेतील शिक्षक ऐक सच्चे मित्र, आदर्श शिक्षक शिवहार ढगे सर यांचा आज मा.खा. प्रितमताई मुंडे, माजीमंत्री तथा भाजपा राष्ट्रीय सचिव मा.पंकजाताई मुंडे, आ. नमिता मुंदडा, बिपिनदादा क्षीरसागर, युवानेते अक्षय मुंदडा यांच्या हस्ते समाजातील बुध्दीजिवी लोकांच्या कार्यक्रमात ढगे यांच्या निस्वार्थी सेवेची व कार्याची दखल घेऊन त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. देशसेवा हीच खरी ईश्वर सेवा समजून आपल्या शिक्षकी पेशाला ऐक अनन्यसाधारण महत्त्व करून देणाऱ्या हाडामासाच्या बुद्धीमान शिक्षकाला बुध्दीवंतांच्या सोहळ्यात यथोचित सन्मानित करण्यात आले. आपण केवळ ऐका चार भिंतींच्या आत भरणाऱ्या शाळेपुरते मर्यादित गुरूजी (शिक्षक) नाहीत. ही संकल्पनाच मुळात मनाला न पटणाऱ्या शिवहार गुरुजींनी यत्किंचितही हार न मानता चार भिंतींच्या आत भरणाऱ्या ८ तासांच्या शाळेबाहेरही आपल्यातील शैक्षणिक दायित्व जपत अंबाजोगाई शहरातील विद्यार्थी ऐका ठराविक चौकटीत राहून केवळ ठरलेल्या दोन-चार क्षेत्रातच करिअर न निवडता त्यांनी आपल्या देशाप्रतीही आपले असलेले कर्तव्य-दातृत्व हे देशाच्या तिन्ही दलात उच्च पदस्थ अधिकारी म्हणून काम करत पार पाडले पाहिजे हा वसा हाती घेऊन सैनिक स्कूल स्पर्धा परिक्षेच्या ज्ञानार्जनाचे सुरू



केलेले मराठवाड्याच्या शैक्षणिक पंढरीतील अंबाजोगाईतील काम आता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहे. एवढेच नाही तर या कार्याचे यथायोग्य मूल्यमापन केले तर आज ढगे गुरूजींचे अगणित विद्यार्थी अगदी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून ढगे गुरुजींच्या सकाळ-संध्याकाळ होणाऱ्या ऑनलाईन वैशिष्ट्यपुर्ण शिकवणीच्या जोरावर आणि आपल्या वैयक्तिक कष्टाने अल्पावधीतच देशभरातील वेगवेगळ्या सैनिक स्कूलच्या माध्यमातून देशाच्या तिन्ही दलात मोठमोठ्या हुद्यांवर अधिकारी म्हणून आपले कर्तव्य चोख बजावत असुन त्यांचे कार्य-नाव आता सातासमुद्रापार पोहचले आहे. तर आजमितीला असंख्य विद्यार्थी आणि अलिकडे तर विद्यार्थीनीही सैनिक स्कूल परिक्षेत यशस्वी होऊन निरनिराळ्या सैनिक स्कुल मधे भरती होत लवकरच येणाऱ्या काळात देशसेवेसाठी तिन्ही दलात दाखल होतील. असे ऐक नामानिराळे दायित्व स्वीकारलेल्या आणि ते तन-मन-धनाने कुठल्याही अपेक्षे विरहित अगदी किरकोळ मुल्यात शिक्षण क्षेत्रात ऐक अमुल्य शैक्षणिक कार्य करणाऱ्या शिवहार ढगे गुरुजींनी आज जो अमुलाग्र बदल घडवून आणलेला आहे. अनेकांच्या जीवनात तिच ती पहाट न उजाडू देता शेकडो कुटुंबीयांच्या जीवनात ऐक नव्या पर्वाची, नव्या स्वप्नांची, नवी नयनरम्य सुंदर अशी सर्वांगीण पहाट नव्याने निर्माण केली. आज अशाच त्या अलौकिक ज्ञानार्जनाची दखल घेऊन अंबाजोगाईत बुद्धीवंताच्या कार्यक्रमात येथील बुद्धीमान मंडळींनी ऐका ख-याखु-या बुध्दीमान शिक्षकाचा यथोचित सत्काराने जो मान-सन्मान केला आहे.

त्यामुळे केवळ शिवहार ढगे गुरूजी यांच्या एकट्या पुरता हा सत्कार मर्यादित नसून तो त्यांच्या कुटुंबीयांसह, सहकारी, मित्र आणि सैन्यातील तिन्ही दलातील सर्वच अधिका-यांचा असल्याची भावना यशवंत पाल्यांच्या काही पालकांनी दै.आधुनिक केसरीशी बोलताना सांगितले.

# भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनमार्फत सर्पजन जनजागृती कार्यक्रम



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड मुंबई मनमाड बिजासन व निसर्ग वेध स्वयंसेवी संस्था उत्तर महाराष्ट्र सर्प मित्र ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने धुळ्यातील अवधान पेर्टोल पम्प येथे सर्पजन जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. उत्तर महाराष्ट्र ग्रुप ह्यांच्या मार्फत सम्पूर्ण महाराष्ट्रात सर्पा विषयी घ्यावयाची काळजी व जागृती यासंदर्भात कार्यक्रम घेतला जात आहे. धुळ्यातही आज सर्पजन विषयी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला आहे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन यांच्या सुरक्षा गार्ड सेवा बजावत असताना सापाशी होणारा संपर्क व सापा पासून कसा बचाव करायचा व सेवा बजावत असताना सर्पदंश झाल्यावर कुठल्या पद्धतीने प्रथमोपचार केला पाहिजे. सापाविषयी समज गैरसमज याविषयी लोकांच्या मनातली भीती दूर या जनजागृती कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. ह्या कार्यक्रमात पेट्रोल लाईन गार्ड यांच्या मनात असंख्य प्रश्न होते व त्या प्रश्नाचे सर्पमित्रांनी सोप्या भाषेत निराकरणही केल आहे. कार्यक्रमात सुरक्षा गार्ड प्रमुख संजय तांबाडे यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे नियोजन सर्पमित्र आकाश सोनवणे यांनी केले होते तर या कार्यक्रमाला सर्पतज्ञ निर्भय साकला, सर्पतज्ञ नरेश सोनार यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# अतिवृष्टीची सरसकट भरपाई द्या नसता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा रास्तारोको

## शेतकऱ्यांचा दसरा गोड करावा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जून ते ऑगस्ट २०२२ दरम्यान औरंगाबाद जिल्ह्यासह पैठण तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानी बाबत पंचनाम्याचा आग्रह न धरता नुकसान भरपाई मिळणे बाबत . नसता दि .१० आक्टोंर रोजी औरंगाबाद जिल्ह्यास्तरावर रास्ता रोको आंदोलन करणे बाबत महोदय उपरोक्त विषयी आपणास निवेदन देण्यात येते की , जून ते ऑगस्ट २०२२ दरम्यान औरंगाबाद जिल्ह्यासह पैठण तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे . सदरील अतिवृष्टी पावसामुळे शेतकऱ्यांना हाता तोंडाशी आलेला घास सुध्दा हिरावल्या गेला आहे . तरी शेतकऱ्यांना प्रचलित दरापेक्षा जास्तीची नुकसान भरपाई देण्यात यावी . सदरील नुकसान भरपाई देतांना महसुल पंचनाम्यात वेळ न घालवता शेतकऱ्यांचा दसरा गोड करावा यासाठी व शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी नसता स्वाभीमानी शेतकरी संघटना व शेतकऱ्यांच्या वतीने दि . १० आक्टोंबर रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व तालुक्यात व जिल्हास्तरावर रास्ता रोको आंदोलन करुन निदर्शने करण्यात येतील याची नोंद घ्यावी ही विनंती . तसेच दसरा सणा नंतर संपूर्ण औरंगाबाद जिल्ह्यातील साखर कारखाने यांचे बॉयलर पेटणार आहे तरी पैठण तालुक्यातील शेतकऱ्यांनाकडून बाहेरील तालुक्यातील कारखान्याकडून लुट होत असल्याने ती लुट टाळण्यासाठी सर्व कारखान्यांचे प्रतिनिधी व शेतकरी संघटना व शेतकऱ्यांची बैठक बोलावून त्यात ऊस दर व इतर बाबी निश्चित करणे गरजेचे आहे जिल्हादंडाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे आयोजित करिता त्यासोबती यांची बैठक साखर सहसंचालक, क्रांती चौक औरंगाबाद यान्चे संयुक्त सभेचे आयोजन करण्यात यावे. या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे वतीने पैठण तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी प्रकाश बालवडकर, प्रदेश उपाध्यक्ष, ज्ञानदेव मुळे (युवा जिल्हाध्यक्ष,स्वाभिमानी) संतोष तांबे (पैठण तालुकाअध्यक्ष स्वाभिमानी) चंद्रकांत झारगड, दिलीप नरके, शिवाजी साबळे, कृष्णा नरके, संतोष नरके, बबनराव नवले, सुमित करकसे, समाधान डोंगरे आदींची उपस्थीती होती.




# शिवभोजन थाळी बंद करण्याचा निर्णय झाल्यास राष्ट्रवादी कडाडून विरोध करेल : महेश तपासे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कोरोनाच्या काळात जेव्हा उपहारगृह बंद होती. लोकांचा रोजगार बंद होता. रोजंदारी बंद होती त्याकाळात महाराष्ट्रातल्या सामान्य माणसाला पोटाची भूक भागवता यावी या दृष्टिकोनातून महाविकास आघाडीने शिवभोजन थाळी उपक्रम राज्यभर राबवला होता त्यामुळे गरीबांची ही शिवभोजन थाळी बंद करण्याचा निर्णय केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस कडाडून विरोध करेल असा स्पष्ट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी दिला आहे.

शिवभोजन थाळीच्या माध्यमातून लाखो गरीब व सर्वसामान्य लोकांना अतिशय अल्पदरात स्वादिष्ट व पौष्टिक थाळी देण्यात आली होती. घरकामगार, फेरीवाले, रिक्षावाले अशा लाखो लोकांसाठीच शिवभोजन थाळीची संकल्पना महाविकास आघाडीने मांडली असेही महेश तपासे यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रात नव्याने स्थापन झालेले ईडीसरकार ठाकरेसरकारच्या सर्व योजनांचा फेरआढावा घेत सर्वसामान्यांची शिवभोजन थाळी बंद करण्याच्या किंवा त्याच्यात कपात करणार असल्याच्या बातम्या येत आहेत. शिंदेसरकारने शिवभोजन थाळी बंद केल्यास किंवा कुठलीही कपात केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस रस्त्यावर उतरून आंदोलन करेल असेही महेश तपासे यांनी स्पष्ट केले.

# चिकन, मटन बेभाव विक्री करणाऱ्यावर धडक कारवाई

## फर्दापूर ग्रामपंचायत : विक्रेत्याचे धाबेच दणाणले

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापुर येथे या गावच्या ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी सुनील मंगरुळे यांनी अव्वाच्या सव्वा भावात चिकन, मटन विक्री करणाऱ्या अवैध दुकानदारांना नोटीसी दिल्या असून फर्दापुरात चिकन मटन विक्री करणाऱ्या विक्रेत्याचे धाबेच दणाणले आहे.

त्या कारवाईमुळे चिकन, मटन विक्रेत्यामध्ये एकच खळबळ माजली आहे. फर्दापुर गाव हे जपान असल्या सारखेच या गावाकडे बघितले जाते या गावातील मोठ्या प्रमाणावर चिकन, मटन, वेगवेगळ्या प्रकारचे फ्रुट परवाना नसतांना सुद्धा अवैध विक्री होत आहे. हे सर्व चिकन, मटण, विक्रेते एकही दुकानदार यांनी ग्रामपंचायतचे ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही किंवा ग्रामपंचायतला कोणत्याही प्रकारचा टॅक्स ग्रामपंचायतला भरत नाही फ्रुड परवाना सुद्धा नाही.राष्ट्रीय महामार्ग रोडला लागून असलेल्या जागेवर अतिक्रमण करून यांनी दुकाने बसवलेल्या आहेत. गेल्या महिन्यात दहा दिवस गणेश उत्सव असताना सर्व चिकन,मटण विक्रेते यांनी 100 रुपये किलो चिकन विक्री केली होती.व बोकड्याचे मटण 600 रुपये किलो विक्री करण्यात आली. मात्र गणेश विसर्जन झाल्या नंतर ताबडतोब सर्व अवैध चिकन,मटण,विक्रेते यांनी 260 किलो रुपये नवीन दर लावून मनमानीपणा करून ग्राहकांची सर्रास लुट केली.

फर्दापुर येथील एक आडदांड चिकन विक्रेता याला एका ग्राहकांने जास्त भाव फलका बद्दल विचारपूस केली की अजिंठा गावामध्ये तर 140 रुपये किलो चिकन भेटते तुम्ही का 260 रुपये चिकन विकतात गावात मलेरिया, आजार साथ चालू आहे चिकन वर हिरव्यागार माशी बसतात चिकन झाकून ठेवेत जा स्वच्छ पाण्याने धुऊन काढत जा यामुळे आजार होऊ शकतो आरोग्य धोक्यात येऊ शकते.असे विचारले असता एक चिकन विक्रेता शेख राजू शेख शब्बीर हा गुंड प्रवृत्तीची भाषा करून ग्राहकांन सोबत नेहमीच अररेरावीची भाषा करत असतो एका ग्राहकांला तो बोलला की, “लेना होगा तो ले, हमारा कोई कूच बिघाड नही सकता” ग्रामपंचायत मे सरपंच, सदस्य, हमारे ही है,पोलिस स्टेशन मे हमारे खिलाफ अगर तक्रार भी करे तो कूच फायदा नही है अशा पद्धतीची आडदांड भषा वापरुन दमदाटी दिली. तो ग्राहक यांनी “साप्ताहिक आपले ज्ञानपंख वृत्तपत्राकडे त्याने आपली कैफियत मांडून तक्रार केली की, चिकन,मटन विक्रेता हा आडदांड ,व गुंड



प्रवृत्तीची भाषा करत असून तो विक्रेता हा नेमके कोणाच्या आशीर्वादामुळे बोलतो हे ही बघणे महत्त्वाचे आहे.

सर्व चिकन, मटण विक्रेते यांना ग्रामपंचायतने नोटिसा दिल्या आहेत 260 रुपये दर कमी करून योग्य*भावात विक्री करावी . जवळच्या गावात ज्या पद्धतीने चिकन मटन विक्री केली जाते त्याच पद्धतीने म्हणजेच 140 रुपये भावाने विक्री करावी व ग्रामपंचायतला टॅक्स पावती भरावी . अन्यथा पोलिस स्टेशन मध्ये एक निवेदन देऊन सर्व विक्रेते वर कार्यवाही करण्यात येईल .
–**सुनील मंगरुळे**, ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय फर्दापुर

# गांधी कुटुंबांवरील दवाबतंत्र अशोक गेहलोतांना भोवले

## काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून बाहेर?

आधुनिक केसरी न्यूज



**राजस्थान :** काँग्रेसमधील मुख्यमंत्रीपदाचा पेच अद्यापही कायम आहे. अशोक गेहलोतांना हटवून काँग्रेस नेते सचिन पायलट यांच्याकडे मुख्यमंत्रीपद देण्यास आमदारांनी विरोध केला आहे. त्यानंतर आता मोठी माहिती समोर आली आहे. अशोक गेहलोत काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून बाहेर पडले आहेत. गेहलोत यांनी मुख्यमंत्रीपद सोडण्यास नकार दिल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. याबाबत एनडीटीव्हीने वृत्त दिलं आहे.
मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी काँग्रेस अध्यपदाची निवडणूक लढणार असल्याची घोषणा केली. त्यानंतर राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदासाठी सचिन पायलट यांचं नाव आघाडीवर होते. यासाठी सोनिया गांधी यांनी मल्लिरार्जुन खरगे आणि अजय माकन यांना काँग्रेसच्या आमदारांचे मत जाणून घेण्यासाठी पाठवलं होते. मात्र, रविवारी संध्याकाळी मुख्यमंत्री निवासस्थानवरील पूर्वनियोजित बैठकीला हे आमदार फिरकले नाहीत. विधानसभेतील काँग्रेसचे मुख्य प्रतोद महेश जोशी यांनी ऐनवेळी ठिकाण बदलून अन्यत्र गेहलोत समर्थक आमदारांची बैठक घेतली. या आमदारांनी सचिन पायलट यांना मुख्यमंत्री करण्यास विरोध दर्शवला. गेहलोत निष्ठावानाला मुख्यमंत्री करावे, काँग्रेस पक्षाध्यपदाची निवडणूक झाल्यावर मुख्यमंत्रीपदाचा निर्णय घ्यावा, अशी मागण्या आमदारांनी केल्या. तसेच, ९० आमदारांनी विधानसभा अध्यक्षांकडे आपले राजीनामे देत सरकारला अस्थिर आणि गांधी कुटुंबावर दबाव वाढवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आता काँग्रेसच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी अशोक गेहलोत यांना अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून बाहेर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. अशोक गेहलोत यांच्याऐवजी मल्लिकार्जुन खरगे, दिग्विजय सिंह यांच्या नावांची चर्चा सुरु झाली आहे.

# तर सरकार दसऱ्यापूर्वीच कोसळेल, अमोल मिटकरींचा सूचक इशारा!

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राज्यातील सत्तासंघर्षावर देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच सुनावणी सुरू आहे. या सुनावणीकडे अवघ्या महाराष्ट्राचे आणि देशाचंही लक्ष लागले आहे. एकीकडे शिंदे गटात असलेल्या आमदारांच्या पात्र-अपात्रतेचा निर्णय न्यायालयाकडू अपेक्षित असताना दुसरीकडे धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह नेमकं कुणाचे? या वादावरही निर्णय येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या सुनावणीची सध्या जोरदार चर्चा चालू आहे. त्यात आजपासून सर्वोच्च न्यायालयाचं कामकाज लाईव्ह प्रक्षेपण सुरू झाल्यामुळे सर्वांनाच ही सुनावणी थेट पाहाता येत आहे. यासर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर जर शिंदे गटातील आमदार अपात्र ठरले, तर पुढे काय घडणार? याचीही चर्चा जोर धरू लागली आहे. सर्वोच्च न्यायालयात शिवसेनेकडून कपिल सिब्बल आणि अभिषेक मनू सिंघवी बाजू मांडत आहेत. निवडणूक चिन्हाच्या आधी आमदारांच्या पात्र-अपात्रतेचा निर्णय व्हावा, अशी मागणी शिवसेनेकडून करण्यात आली आहे. मात्र, एकनाथ शिंदे गटाकडून आधी निवडणूक चिन्हावर निर्णय व्हावा, अशी मागणी अंतरिम अर्जाद्वारे करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर न्यायालय नेमका काय निर्णय घेणार? याकडे सगळ्यांचं लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी सुनावणीच्या अनुषंगाने सोमवारी संध्याकाळी केलेल्या एका ट्विटवरून जोरदार चर्चा सुरू झाली आहे. सर्वोच्च न्यायालयात शिंदे गटातील आमदार अपात्र ठरले, तर राज्यात काय घडणार? याची चर्चा सुरू झालेली असताना असं झालं तर पुढच्या १० दिवसांत राज्यातलं सरकार कोसळेल, असं भाकित आमदार अमोल मिटकरींनी केलं आहे. मिटकरींनी ट्वीटमध्ये न्यायालयात सध्या सुरू असलेल्या सुनावणीचा संदर्भ दिली आहे. काल केलेल्या या ट्वीटमध्ये मिटकरी म्हणतात, उद्या १६ आमदार अपात्र ठरल्यास हे सरकार दसऱ्यापूर्वीच कोसळेल. न्यायदेवता न्याय देईलच. आज न्यायालयात चालू असलेल्या सुनावणीदरम्यान दहाव्या सूचीचा मुद्दा चर्चेत आला. शिवसेनेची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी या सूचीचा संदर्भ देत शिवसेनेमधून शिंदे गट बाहेरच पडल्याचं मान्य करत नसेल तर त्यांनी व्हिपचं पालन करुन बैठकीला हजेरी का लावली नाही, असा सवाल उपस्थित केला.



# उद्धव ठाकरेंची अमित शहांवर टीका

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ज्यातील सत्तासंघर्ष, आमदार अपात्रता आणि खरी शिवसेना कोणाची, मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठाकडे सुनावणी सुरु आहे. त्यात आता शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपावर हल्ला केला आहे. मला आई भवानी, न्यायदेवतेवर विश्वास आहे. विजय आपलाच होणार आहे. कितीही अफजल खान आले तरी घाबरणार नाही, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी अप्रत्यक्षपणे गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका केली आहे. उस्मानाबाद येथून आलेल्या कार्यकर्त्यांनी मातोश्रीवर शिवबंधन बांधलं. यावेळी उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना संबोधित केलं. तेव्हा आमदार कैलास पाटील, खासदार ओमराजे निंबाळकर उपस्थित होते. आई भवानीचा आशीर्वाद असल्यावर कितीही अफजल खान आले तरी घाबरणार नाही. दसऱ्याला आपण भेटणार आहोत. एक चांगली सुरूवात झाली आहे. न्यायालयात दुसरी केस सुरु आहे. माझा आई भवानीवर आणि सर्वोच्च न्यायालयावर विश्वास आहे. न्याय आपल्याला मिळणार," असा विश्वास उद्धव ठाकरेंनी व्यक्त केला आहे. तुळजाभवानीच्या दर्शनाला मी येणारच आहे.

# एनआयएकडून आठ राज्यांत पीएफआयवर छापेमारी

## कर्नाटकातून ४५ सदस्य ताब्यात, आठवड्यातील दुसरी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज



**कर्नाटक :** राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून (NIA) आज पुन्हा 'पोप्युलर फ्रंट ऑफ इंडिया'च्या (PFI) ठिकाणांवर छापेमारी करण्यात येत आहे. एनआयए आणि इतर तपास यंत्रणांकडून या कट्टरपंथी संघटनेविरोधात कारवाई करण्यात येत आहे. तपास यंत्रणांकडून देशातील आठ राज्यांमध्ये छापेमारी सुरू आहे. कर्नाटकमधून पीएफआयच्या ४५ सदस्यांना यंत्रणांनी ताब्यात घेतले आहे. या सदस्यांना स्थानिक तहसीलदारांपुढे हजर करण्यात आल्यानंतर न्यायालयीन कोठडीची मागणी करण्यात येणार आहे. पुण्यातूनही पोलिसांनी पीएफआयच्या सहा समर्थकांना ताब्यात घेतले आहे.
पीएफआयवर पहिल्यांदा छापेमारी करण्यात आल्यानंतर या संघटनेच्या सदस्यांच्या चौकशीतून महत्त्वाची माहिती समोर आली होती. या चौकशीच्या आधारे एनआयए आणि पोलिसांकडून देशातील आठ राज्यांमध्ये छापेमारी करण्यात येत आहे", अशी माहिती एनआयए सूत्राने दिली आहे. आसाममध्ये पहाटे पाच वाजल्याच्या सुमारास करण्यात आलेल्या छापेमारीत पीएफआयच्या सात सदस्यांना अटक करण्यात आली आहे. कामरुप जिल्ह्यातील नागारबेरामधून या सदस्यांना अटक करण्यात आली आहे. सोमवारी रात्रीपासून उत्तर प्रदेशातील सिआना, सरुरपूर आणि मेरठच्या लीसरी गेट परिसरात छापेमारी करण्यात येत आहे. मेरठ, बुलंदशहर आणि सीतापूरमधून काही संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. दिल्लीच्या शाहीन बाग आणि जामियामध्येही तपास यंत्रणांकडून छापेमारी केली जात आहे. या छापेमारीदरम्यान १२ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. तपास यंत्रणांसह पोलिसांच्या विशेष पथकासह स्थानिक पोलिसांकडून ही कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान, २२ सप्टेंबरला एनआयए आणि सक्तवसुली संचालनालयाकडून देशातील १५ राज्यांमधील ९३ ठिकाणांवर छापेमारी करण्यात आली होती. या कारवाईत पीएफआयच्या १०० सदस्यांना अटक करण्यात आली होती.

# नवरात्रोत्सवासाठी फूल बाजार बहरला; पावसामुळे प्रतवारीवर परिणाम

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** नवरात्रोत्सवासाठी फूल बाजार बहरला आहे. पावसामुळे फुलांच्या प्रतवारीवर परिणाम झाला आहे. चांगल्या प्रतीच्या फुलांच्या दरात वाढ झाली आहे. गणेशोत्सवानंतर नवरात्रोत्सवात फुलांच्या मागणीत वाढ होते. छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील फूल बाजारात फुलांची आवक वाढली आहे. रविवारपासून (२५ सप्टेंबर) पुणे, सोलापूर, सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फुले विक्रीस पाठविण्यास सुरुवात केली. पितृपंधरवड्यात फुलांना मागणी नव्हती. हार विक्रेत्यांनी रविवारी फुलांची खरेदी केली. नवरात्रोत्सवात फुलांना मागणी राहणार आहे.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## सेक्स आणि आहार

आधुनिक केसरी

**व्हाईट फिश :** यांच्या सेवनामुळे शुक्राणूंची क्षमता वाढते, गुणवत्ता वाढते आणि शुक्राणूंचा आकारही वाढतो.
**क्लाम्स (CLAMS) :** (सी पिस्ता)- याला समुद्र पिस्ता म्हणतात आणि यात व्हिटॅमीन बी१२ सर्वात जास्त असते. एल अर्जिनीनमुळे नायट्रिक ऑक्साईड ॲसिड वाढते. शरीर पीळदार होते.
**तुर्की ब्रेस्ट (TURKEY BREAST) :** यामध्ये प्रोटिन, अर्जिनीन हे ॲमिनो असिड्स असतात. या पक्षात DHAARMEJA-3 ACID भरपूर असते. जे मेंदूचे काम, मूड आणि फॅट्स कमी करते.
**हेरिंग - (HERRING) :** हा एक फिश आहे. ज्यामध्ये व्हिटॅमीन बी१२, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमीन डी असते.
**ब्लू मुसेलस्स :** व्हिटॅमीन बी१२ आणि IRON, MAGNASIUM या चिली साऊंडिंग मोल्युस्क असतात.
**वॉलनट (आक्रोड) :** पिस्ता, पनीर, वॉलनट यामध्ये एल अर्जिनीन असते.
**आईस्टर्स (शिंपले) :** यामध्ये व्हिटॅमीन बी१२, झिंक, टेस्टोस्टेरॉन, डी, असपाररिक ॲसिड असते, जे शुक्राणू वाढवते.
**फॉर्टिफाईड सिरियल्स (FORTIFIED CEREAL) :** यामध्ये मुबलक प्रमाणात व्हिटॅमीन बी१२ असते.
**दमियाना लीफ (DAMIANA LEAF) :** यामुळे स्ट्रेस कमी होतो, रीलॅक्सपणा जाणवतो. तसेच मज्जासंस्थेला हे बुस्ट करत असते. याची पाने प्रोजेस्टिनयुक्त असतात.
ग्रीक योगर्ट (GREAK YOGUART) : यात व्हिटॅमीन बी१२ असते, के-पोटॅशियम असते. याच्या सेवनामुळे वजन कमी होते.
**गोजी बेरीज (GOJIBERRIES) :** याला व्हियाना ऑफ चायना असं म्हटलं जातं. हे रक्त पुरवठा वाढवते. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# दुधाला एफआरपी देण्याची मागणी; संघर्ष समितीकडून मुख्यमंत्र्यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** दूध दरातील चढ-उताराला आळा बसावा. खासगी कंपन्यांच्या मक्तेदारी लगाम बसावा. दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी दुधाला रास्त आणि किफायतशीर दर (एफआरपी) व एकूण उलाढातील वाटा (रेव्हेन्यू शेअरिंग) धोरण लागू करावे, या मागण्यांसाठी दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व दुग्धविकास मंत्री यांना निवेदन सादर केले आहे, अशी माहिती समितीचे निमंत्रक डॉ. अजित नवले यांनी दिली आहे. दूध खरेदी दरांमधील अस्थिरतेमुळे राज्यात दूध व्यवसायाच्या विकासाला मर्यादा आल्या आहेत. राज्यात एकूण संकलित होत असलेल्या दुधापैकी ७६ टक्के दूध खासगी दूध कंपन्यांकडे संकलित होऊ लागल्याने या क्षेत्रात खासगी दुध कंपन्यांची एकाधिकारशाही निर्माण झाली आहे. खासगी कंपन्या संगनमत करून खरेदीचे दर वारंवार पाडतात. या अस्थिरतेमुळे दूध क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत नाही. राज्यातील दुग्ध व्यवसाय विकासालाही मर्यादा येतात. दूध व्यवसायातील अनिश्चितता व अस्थिरता काही प्रमाणात कमी केल्यास राज्यातील दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात विकसित होईल. राज्यातील दूध उत्पादकांनाही दिलासा मिळेल, अशी संघर्ष समितीची भूमिका असल्याचे मत अजित नवले यांनी व्यक्त केले.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in